शनिवार, ६ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक २०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## उपराष्ट्रपतीपद निवडणुकीसाठी आज मतदान व निकाल



**नवी दिल्ली** : देशाचा उपराष्ट्रपती निवडण्यासाठी शनिवारी (दि. ६) मतदान होत असून भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार जगदीप धनखड आणि विरोधी आघाडीच्या उमेदवार मार्गारेट अल्वा यांच्यात थेट मुकाबला होणार आहे. देशाचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे सभापतीदेखील असतात. त्यामुळे या निवडणुकीला महत्त्व आले आहे. निवडणुकीनंतर शनिवारी सायंकाळी लगेच निकाल जाहीर केला जाणार आहे. लोकसभा तसेच राज्यसभेचे सर्व खासदार हे उपराष्ट्रपती निवडणुकीचे मतदार आहेत. सकाळी १० वाजता संसद भवनात उपराष्ट्रपतिपदासाठी मतदानाला सुरुवात होईल. रालोआचे उमेदवार धनखड यांच्या बाजूने लोकसभेत ३०३, तर राज्यसभेत ९१ खासदार आहेत. धनखड यांच्या बाजूने स्पष्ट बहुमत असल्याने त्यांचा विजय ही औपचारिकता मानली जात आहे.

अंतरंग
हर घर तिरंगा अभियान राबविण्यासाठी कोकण सज्ज/२
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम/३
मुरूडमध्ये स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहीम/७

# देशाचा ७५वा वाढदिवस साजरा करूया

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे तिरंगा फडकविण्याचे आवाहन

### कर्जतमध्ये भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

आपण जसा आपल्या घरातील एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस साजरा करतो त्याप्रमाणे आपल्या देशाचा ७५वा वाढदिवस साजरा करूया. आपल्या राष्ट्रीय अध्यक्षांनी बूथ सक्षम करण्यास सांगितले आहे. त्यानुसार कार्यकर्त्यांनी बूथमधील १० घरांवर तिरंगा ध्वज लावण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करून विविध सरकारी योजना त्या त्या व्यक्तीपर्यंत पोहचण्यासाठी लक्ष द्यावे, असे आवाहन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे शुक्रवारी (दि. ५) कर्जत येथे केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्याच हस्ते कर्जत शहरातील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. उद्घाटन समारंभास जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, सरचिटणीस अविनाश कोळी, दीपक बेहेरे, रमेश मुंढे, संजय कराळे, उपाध्यक्ष राजेश मपारा, तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, सरचिटणीस राजेश भगत, किसान मोर्चा कोकण समन्वयक सुनील गोगटे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, श्रीनिवास कोडरू, मंदार मेहेंदळे आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला अभिमान वाटावा असे कार्य करीत आहेत. आपला पक्ष इतरांपेक्षा वेगळा आहे. (पान २ वर..)

## ग्रामपंचायत निवडणुकीतही राज्यात भाजपच नंबर वन!



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात झालेल्या २७१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने निर्विवाद पहिला क्रमांक मिळविला असून निवडणुकांमध्ये नंबर वन राहण्याची परंपरा पक्षाने कायम राखली आहे. या यशाबद्दल मी भाजपच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो आणि मतदारांचे आभार मानतो, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली.

प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील म्हणाले की, शुक्रवारी दुपारपर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार राज्यात ठिकठिकाणी मतदान झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी निर्विवाद यश मिळविले असून पक्ष पहिल्या क्रमांकावर आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी मिळविलेल्या विजयाचा विचार केला तर भाजप-शिवसेना युती आपल्या प्रतिस्पर्धी पक्षांपेक्षा

### प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याकडून कार्यकर्त्यांचे अभिनंदन

खूप पुढे आहे. या यशाबद्दल आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. राज्यात सत्ताबदल होऊन भाजप-शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर झालेली ही पहिली स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आहे व त्यामध्ये जनतेने युतीला पसंती दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राज्यात हिंदुत्वाच्या विचारांचे आणि विकासाचा अजेंडा राबविणारे युतीचे सरकार हवे या भूमिकेतून बदल झाला. त्यानंतर जनतेने दिलेला आशीर्वाद खूप महत्त्वाचा आहे. आगामी महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्येही भाजपच नंबर वन ठरेल, असा विश्वासही प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी या वेळी व्यक्त केला.

## लोकप्रिय, कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकीय अशा क्षेत्रांत कार्यरत असणारे भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त विविध स्तरांतील मान्यवरांनी तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व हितचिंतकांनी शुक्रवारी (दि. ५) शुभेच्छा देत अभीष्टचिंतन केले.

सर्वांत आधी सकाळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आई शकुंतला ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. (पान २ वर.)

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनही अभीष्टचिंतन



अभ्यासू व कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त राज्यभरातील अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर त्यांनी सोशल मीडियावरूनही अभीष्टचिंतन केले. याशिवाय भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार सर्वश्री प्रसाद लाड, नितेश राणे, श्वेता महाले-पाटील, पराग शहा, अमित साटम, निरंजन डावखरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



**उलवे नोड : भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खारकोपर येथील जय साईशक्ती कला, क्रीडा मंडळातर्फे वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मैदानात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष व गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत, युवा नेते किशोर पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष साईचरण म्हात्रे, ज्येष्ठ कार्यकर्ते वामनशेठ म्हात्रे, भाऊशेठ भोईर, व्ही. के. ठाकूर, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, राजू देशमुख, महिला मोर्चा उपाध्यक्ष सुजाता पाटील, राजेश पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## निवडक

### मंकीपॉक्समुळे अमेरिकेत आरोग्य आणीबाणी घोषित

**न्यूयॉर्क** : अमेरिकी नागरिकांमध्ये मंकीपॉक्सचा प्रादुर्भाव वाढत चालल्याने अखेर येथील सरकारने या रोगाला सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केली आहे. जो बायडेन सरकारमधील आरोग्य सचिव झेविअर बेकेर्रा यांनी हा निर्णय जाहीर केला. अमेरिका सरकारकडून या रोगाचा सामना करण्यासाठी आर्थिक तरतूदही करण्यात आली आहे.

### संजय राऊतांच्या अटकेनंतर उद्धव ठाकरे 'सामना'चे संपादक

**मुंबई** : शिवसेना खासदार व दै. सामनाचे कार्यकारी संपादक संजय राऊत यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केल्यानंतर आता या वृत्तपत्राच्या प्रिंट लाइनमध्ये शुक्रवारी (दि. ५) शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे नाव संपादक म्हणून छापण्यात आले आहे. याआधी मुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी संपादकपदाचा राजीनामा दिला होता.

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया स्थगित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१मध्ये केलेल्या दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाकडून शुक्रवारी (दि. ५) स्थगित करण्यात आली. राज्य शासनाकडून सदस्यपदांच्या जागांच्या संख्येत बदल करण्यात आला आहे.

सद्यस्थितीतील मतदार विभाग आणि निर्वाचक गणांची रचना आणि आरक्षणाची प्रक्रियादेखील स्थगित करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाकडे सध्या सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया स्थगित केली गेली आहे. सध्या २५ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या आरक्षणाची अंतिम अधिसूचना शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात येणार होती.

याबरोबर १३ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची केंद्रनिहाय मतदार यादी ८ ऑगस्ट रोजी, तर १२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची प्रारूप मतदार यादी १० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार होती. आता ही सर्व प्रक्रिया आहे त्या स्तरावर स्थगित करण्यात आली आहे.

याबाबत राज्य निवडणूक आयोग लवकरच संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पुढील आदेश देणार आहेत. यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांचा समावेश आहे.



## बलात्कार पीडितेला धमकी दिल्याप्रकरणी केदार दिघेंना समन्स

**ठाणे : प्रतिनिधी**

शिवसेना नेते दिवंगत आनंद दिघे यांचे पुतणे आणि नवनियुक्त ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांना पोलिसांनी समन्स पाठवले आहेत. बलात्कार पीडितेला धमकाविल्याप्रकरणी केदार यांना समन्स पाठवण्यात आले आहेत.

मुंबईतील एन. एम. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर हे समन्स पाठवण्यात आले असून त्यामध्ये चौकशीसाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे सांगण्यात आले आहे. केदार यांचे मित्र रोहित कपूर यांच्याविरोधात २३ वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उरणच्या कंठवलीत भटक्या कुत्र्याची दहशत

### दोन लहानग्यांना चावा; नवी मुंबईत उपचार सुरू

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील कंठवली गावात दोन चिमुकल्या मुलींना भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली असून या जखमी मुलींना तालुक्यातील दोन्ही शासकीय रुग्णालयांत उपचार न मिळाल्याने नवी मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

कंठवली गावातील मैथिली विनोद ठाकूर (वय ३) व ईशा संतोष ठाकूर (वय ३) या दोघी



घराजवळील अंगणात खेळत असताना भटक्या कुत्र्याने या मुलींचा चावा घेतला. त्यांचा आरडाओरडा ऐकल्यानंतर ग्रामस्थांनी दोन्ही मुलींना कुत्र्याच्या तावडीतून सोडविले आणि त्यांना उपचारासाठी त्यांच्या आई-वडिलांनी कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले, पण तेथील डॉक्टरांनी इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात जा असा सल्ला दिला. त्यानंतर इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात गेले असता या रुग्णालयात मुलींवर उपचार होणार नाहीत, तुम्ही इतर रुग्णालयात घेऊन जा, असा सल्ला दिला गेला. अखेर या मुलींना नवी मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

> **दोन मुलींवर कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आल्यानंतर तेथे त्यांच्यावर उपचार होणे गरजेचे होते. जर उपचार झाले नसतील, तर या प्रकरणी मी माहिती घेऊन कार्यवाही करतो.**
> **-डॉ. राजेंद्र इटकर, वैद्यकीय अधिकारी, उरण**

> **या मुलींवर प्राथमिक कोप्रोली आरोग्य केंद्रात उपचार होणे गरजेचे होते, परंतु प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर हे सर्पदंश, कुत्रा चावल्यानंतर किंवा इतर रुग्णांनाही इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात पाठवितात. त्या रुग्णालयात त्यांच्यावर तात्पुरते उपचार करून पुढील रुग्णालयात जाण्याचा सल्ला रुग्णालयाकडून देण्यात आला आहे.**
> **-गौतम देसाई, वैद्यकीय अधीक्षक, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण**

## मुंबई बँकेत पुन्हा प्रवीण दरेकरांचे वर्चस्व

### अध्यक्षपदी बिनविरोध निवड; उपमुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात महाविकास आघाडीला अद्यापही धक्के मिळतच असून आता मुंबई बँकेतही सत्तांतर झाले आहे. भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांची मुंबई बँकेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दरेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जानेवारी महिन्यात झालेल्या मुंबई बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत प्रवीण दरेकर यांच्या सहकार पॅनलने सर्वच्या सर्व २१ जागा जिंकल्या होत्या. १७ जागा अगोदरच बिनविरोध निवडून आल्या होत्या, तर चार जागांसाठी निवडणूक पार पडली. यामध्येही दरेकर यांच्या सहकार पॅनलने बाजी मारली, मात्र सिद्धार्थ कांबळे हे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. अवघ्या सहा महिन्यांत दरेकर यांनी अध्यक्षपद पुन्हा स्वत:कडे खेचून आणले आहे, तर आता कांबळे उपाध्यक्ष असणार आहेत.

राज्यातील सत्तांतरानंतर बँकेचे अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे आणि उपाध्यक्ष विठ्ठल भोसले यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर शुक्रवारी (दि. ५) झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेच्या अध्यक्षपदी प्रवीण दरेकर यांची बिनविरोध निवड झाली.

## नऊ मनपा निवडणुकांची आरक्षण सोडत स्थगित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात सुधारणा केल्याच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. ५) होणारी नऊ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीची आरक्षण सोडत स्थगित करण्यात आली आहे.

**अंतिम आरक्षण अधिसूचनेलाही स्थगिती**

राज्य शासनाच्या निर्णयामुळे महापालिकांच्या निवडणुकांसाठी आरक्षणाची सोडत स्थगित करण्यात आली आहे. त्याचबरोबर अन्य १४ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रसिद्ध करण्यात येणारी अंतिम आरक्षणाची अधिसूचनादेखील स्थगित करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

औरंगाबाद, नांदेड-वाघाळा, लातूर, परभणी, चंद्रपूर, भिवंडी- निजामपूर, मालेगाव, पनवेल आणि मीरा-भाईंदर या नऊ महापालिकेच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी आरक्षण सोडत काढण्यात येणार होती. ती आता काढण्यात येणार नाही.

याशिवाय बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, अमरावती, आणि नागपूर या १४ महापालिकांच्या आरक्षणाची अंतिम अधिसूचानादेखील प्रसिद्ध केली जाणार नाही.

## योग्य वेतन द्या; अन्यथा आंदोलन!

### आमदार महेश बालदींचा अमेटी युनिव्हर्सिटीला इशारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



अमेटी युनिव्हर्सिटीमध्ये काम करणाऱ्या प्रकल्पग्रस्त कामगारांना योग्य वेतन द्यावे; अन्यथा अमेटी युनिव्हर्सिटीविरोधात आंदोलन करण्याचा पवित्रा आमदार महेश बालदी यांनी घेतला आहे.

या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी अमेटी युनिव्हर्सिटीच्या व्यवस्थापनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील भाताण येथील अमेटी युनिव्हर्सिटीमध्ये साधारणत: १०० प्रकल्पग्रस्त कामगार विविध विभागांमध्ये कार्यरत आहेत आणि या आस्थापनेमध्ये काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतनापेक्षा कमी पगार दिला जात आहे, असे माझ्या निदर्शनास आले असून मध्यंतरीच्या काळात सर्व स्थानिक प्रकल्पग्रस्त कामगारांनी रायगड जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त (पनवेल) यांच्याकडे या संदर्भात दावा दाखल केला होता, मात्र अमेटी युनिव्हर्सिटीच्या संबंधित व्यवस्थापन उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळकाढूपणाची भूमिका घेत आहे. ही भूमिका कामगारांवर अन्याय करणारी आहे.

कामगारांवर अन्याय दूर करण्यासाठी संबंधित पत्राची दखल घेऊन कामगारांच्या वेतनासंबंधी बैठकीचे आयोजन करून स्थानिक कामगारांना न्याय द्यावा; अन्यथा अमेटी युनिव्हर्सिटी व्यवस्थापनाविरुद्ध आंदोलन छेडले जाईल आणि त्यामुळे होणाऱ्या परिणामास अमेटी युनिव्हर्सिटी व्यवस्थापक पूर्णपणे जबाबदार राहतील, असेही या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# हर घर तिरंगा जनतेच्या मनातील कार्यक्रम

## राष्ट्रवादीच्या भूमिकेवर भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्येंचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संपूर्ण देशातील जनता उत्सव साजरा करत असताना या उत्साहात मिठाचा खडा टाकणाऱ्यांचा राष्ट्रद्वेषच यानिमित्ताने देशासमोर आला आहे. 'हर घर तिरंगा' हा एका राजकीय पक्षाचा कार्यक्रम नसून देशातील कोट्यवधी लोकांच्या प्रतिसादामुळे हा राष्ट्रभक्तीचा उत्सव ठरला आहे. या कार्यक्रमाला नावे ठेवणाऱ्या प्रवृत्तींनी आपली मानसिकता उघड केली आहे, अशी टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. ५) केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ही देशातील प्रत्येक नागरिकांसाठी अभिमानाची बाब आहे. संपूर्ण देश हा सोहळा साजरा करण्यासाठी सज्ज झालेला असताना, राष्ट्रवादी काँग्रेसने मात्र केवळ राजकीय क्षुद्रपणातून या सोहळ्याच्या विरोधात भूमिका घेतली आहे. राष्ट्रहिताच्या कोणत्याही मोहिमेस नेहमीच खो घालणाऱ्या साडेतीन जिल्ह्यांपुरतेच जेमतेम अस्तित्व असलेला हा पक्ष असल्याचे उपाध्ये म्हणाले.



देशभर उत्साहाने साजरा होत असलेल्या हर घर तिरंगा या राष्ट्रीय उत्सवास नाव ठेवून राष्ट्रवादीने आपल्या प्रवृत्तीचे उघड प्रदर्शन केले आहे अशा राष्ट्रीय सोहळ्यांना विरोध करण्यामुळे देशातील राष्ट्रविरोधी राजकारणाचे मुखवटे जनतेसमोर आपोआपच उघडे पडले आहेत. अशा मानसिकतेची कीड देशातच फोफावत असल्याने देशाबाहेरील विघातक शक्तींना बळ मिळते, असेही उपाध्ये म्हणाले.

देशद्रोही दहशतवादी दाऊदशी संबंध असलेल्या नवाब मलिकांना अटक होऊनही त्यांचे मंत्रिपद कायम ठेवून त्यांचे समर्थन करणारे, मुंब्रा येथील दहशतवादी इशरत जहांच्या समर्थनासाठी निधी गोळा करून तिला राष्ट्रभक्त ठरविणारे, देशाच्या स्वातंत्र्य सोहळ्यास विरोध करणारे आणि राष्ट्रध्वज उभारण्याच्या मोहिमेस नाव ठेवणारे राष्ट्रवादीचे नेते आणि प्रवक्ते आपल्या देशविरोधी कृतीतून आपल्या अकलेचा बाजार मांडत आहे.

मिटकरी, आव्हाड, भुजबळ यांच्यासारख्यांच्या मुखातून अन्य कोण बोलत असते हे जनतेला माहित आहे. जनतेने आता ओळखले असून अशा राष्ट्रद्रोही मानसिकतेला जनमाणसात थारा मिळणार नाही, असा इशाराही उपाध्ये यांनी दिला.

स्वातंत्र्याचा सोहळा साजरा करणे हा प्रत्येक देशवासियांचा हक्क असताना हर घर तिरंगा मोहिमेस नाव ठेवून देशाच्या राष्ट्रध्वजाचा अपमान करणाऱ्या मिटकरी यांच्यावर आणि त्या वक्तव्यावर मौन पाळून त्याला संमती देणाऱ्या नेत्यांवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणीही उपाध्ये यांनी या दरम्यान केली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संपूर्ण देशातील जनता उत्सव साजरा करण्यात मग्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात या अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन सुरु आहे. जनतेच्या मनातील हा कार्यक्रम आहे. एक उत्साह दिसून येत आहे. त्यामुळे कुणीही खो घालण्याचा प्रयत्न करु नये. हा उत्सव एका राजकीय पक्षाचा नाही. देशातील कोट्यवधी लोकांच्या प्रतिसादामुळे हा राष्ट्रभक्तीचा उत्सव ठरला आहे. याला कुणी विरोध करत असेल तर त्यांची ती मानसिकता असल्याचेही उपाध्ये या वेळी बोलताना म्हणाले.

# हर घर तिरंगा अभियान राबविण्यासाठी कोकण सज्ज

## कोकण विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर यांची माहिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने केंद्र सरकारच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हर घर तिरंगा अभियान राबविण्यासाठी कोकण विभाग सज्ज झाला असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली.

१५ ऑगस्ट रोजी देशाचा स्वातंत्र्य महोत्सव साजरा होत असल्याने, केंद्र सरकारने देशाचे वीर जवानांच्या आठवणी आणि स्वातंत्र्य अमृत महोत्सव निमित्ताने याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहचावे म्हणून 'हर घर तिरंगा' फडकविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. हर घर तिरंगा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोकण विभागीय आयुक्त मार्फत जिल्हा, तालुका, शहर, महापालिका, पातळीवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. यात ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यातील एकूण २९९० ग्रामपंचायतीत २६५० ग्रामसभा



आयोजित करण्यात आल्या तर ३४० ग्रामपंचायतीत विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे डॉ. कल्याणकर यांनी या वेळी सांगितले. १३ ते १५ऑगस्ट दरम्यान, घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे प्रत्येकाने पालन करावे. विभागातील घरे, सरकारी, खासगी कार्यालय अशी ग्रामीण भागातील ध्वज संख्या २२,१९,१११ आहे. त्यापैकी स्थानिक पुरवठादार आणि बचत गट यांच्यामार्फत १७,३१,६६७ ध्वज उपलब्ध होणार असल्याचे डॉ. कल्याणकर यांनी सांगितले. दरम्यान या राष्ट्रभक्तीच्या उत्सवानिमित्त सर्वत्र नियोजन सुरु आहे.

### अभियानांतर्गत विविध कार्यक्रम

हर घर तिरंगा अभियान राबविण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सांगितले. 'हर घर तिरंगा' अभियान अंतर्गत विशेष बाब म्हणून केंद्र सरकारच्या सूचनेनुसार ५ ते १७ सप्टेंबर दरम्यान स्वच्छ सागर सुरक्षित सागर मोहीम राबविण्यात येत आहे. यात रायगड जिल्ह्यातील मुरुड समुद्र किनाऱ्यापासून सुरुवात करण्यात आली असल्याचे डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या वेळी सांगितले.

# सीकेटी कॉलेजमध्ये आविष्कार संशोधन अधिवेशन कार्यशाळा; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) व मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने १७व्या आंतरमहाविद्यालयीन आविष्कार संशोधन अधिवेशन कार्यशाळेचे बुधवारी (दि. ३) आयोजन करण्यात आले हाते. या वेळी मुंबई विद्यापीठ विशेष कार्यासीन अधिकारी मीनाक्षी गुरव, प्रगत प्रशिक्षण आणि संशोधन संस्था आंतरविद्याशाखीय विज्ञान संचालक डॉ. शशीकुमार मेनन आणि रिसर्च पीआय, डीएसटी-एसईआरबीच्या डीन डॉ. सुनीता शैलजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेत रायगड झोन आविष्कार संशोधन संमेलनाचे जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश भगत आणि डॉ. जगदीश ठाकूर यांचाही सहभाग होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय के. पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाच्या तथा




आविष्कार संशोधन अधिवेशनातील कीर्तीचा मागोवा घेतला. याबरोबरच डॉ. सुनील पाटील यांनी ही कार्यशाळा मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानले. सर्व वक्त्यांनी आविष्कार संशोधन अधिवेशनाबाबत माहितीपूर्ण सत्रांद्वारे विविध पैलू उलगडले आणि संशोधन प्रकल्पासाठी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन अतिशय बारकाईने बनवण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या सत्रात रायगड विभागातील ३२ विविध महाविद्यालयातील प्राध्यापक आणि ७२ विद्यार्थी उपस्थित होते. आविष्कार रिसर्च असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. सीमा कोकीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली समितीच्या सर्व सदस्यांसह कार्यशाळेचे यशस्वी नियोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. अहवाल वाचनाबरोबरच आभार डॉ. शर्मिला घंगाळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

### चालकाने २५ प्रवाशांना सुरक्षित करून सोडले प्राण

**सातारा : प्रतिनिधी**

आपल्या प्रकृतीची तमा न करता गाडीतील २५ प्रवाशांना सुखरूप करून एसटी चालकाने प्राण सोडले. चालक जालिंदर पवार (वय ४५, रा. पळशी, ता. खटाव, जि. सातारा) या चालकाच्या जिगरबाज वृत्तीचे कौतुक होत आहे.

'शो मस्ट गो ऑन' असे म्हणत दुसऱ्या चालकासह एसटी पुढच्या प्रवासाला मार्गस्थ झाली. एखाद्या चित्रपटात शोभेल अशी ही करूण कहाणी सर्वांना चटका लावून गेली. वसई-म्हसवड ही गाडी ३ ऑगस्ट रोजी दुपारी दीडच्या सुमारास स्वारगेट स्थानकात आली. तेथे जालिंदर पवार यांच्याकडे गाडीचा ताबा आला. त्यानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी स्वतःवर ताबा ठेवत प्रवाशांना सुरक्षित केले.



**पनवेल : ५५व्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सव रायगड विभागीय स्पर्धेत खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय या वर्षीदेखील चॅम्पियन ठरले. 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांनी १७ सुवर्ण, सहा रौप्य व एक कांस्यपदक मिळविले. याबद्दल भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक व सीकेटी महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग समन्वयक गणेश जगताप, भाजप सांस्कृतिक सेलचे कौस्तुभ सोमण यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.**



**पनवेल : महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब'चे माजी सभापती समीर ठाकूर यांचा वाढदिवस गुरुवारी साजरा झाला. त्याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी समीर ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेविका राजश्री वावेकर, युवा नेते मयुर आंग्रे आदी उपस्थित होते. समीर ठाकूर यांचा वाढदिवस केक कापून साजरा झाला.**

### प्रा. विनायक आंबेकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**मुंबई :** भाजपाचे प्रदेश चर्चा प्रतिनिधी (पॅनेलिस्ट ) प्रा. विनायक आंबेकर यांच्या, 'किंगमेकर क्रॉनिकल-वसुली व घोटाळ्यांचे पर्व' या पुस्तकाचे प्रकाशन भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांच्या हस्ते व भाजपा प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. ४) भाजपा प्रदेश कार्यालयात करण्यात आले. दरम्यान, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रवक्ते असिफ भामला यावेळी उपस्थित होते.

पान १ वरून

### देशाचा ७५वा वाढदिवस साजरा करूया

अटलजी पंतप्रधान असताना त्यांनी एक महत्त्वपूर्ण योजना आणली. या योजनेला त्यांनी स्वतःचे नाव न देता पंतप्रधान सडक योजना हे नाव दिले तसेच आपल्या देशाच्या राष्ट्रपतीपदी द्रौपदी मुर्मू यांच्या रूपाने एका आदिवासी महिलेला विराजमान केले गेले. भाजपने २०१४ साली २८२ जागा, तर २०१९ साली ३०३ जागा मिळविल्या असल्या तरीसुद्धा सर्वांना बरोबर घेऊन मोदींजी काम करीत आहेत. यापूर्वी एखादी साथ आली की परदेशातून लस घ्यावी लागत असे. प्रसंगी त्यासाठी हांजी हांजी करावी लागत होती, पण मोदींजींनी लस उत्पादनासाठी अर्थसहाय्य करून कोरोनाच्या दोन लसी उपलब्ध करून दिल्या आणि त्या देशातील सर्व जनतेला मोफत दिल्या जात आहेत. आपला भारत आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने काम करीत आहेत.

कर्जतमधील भाजपचे हे कार्यालय नेहमी उघडे राहून येथून लोकांची कामे झाली पाहिजेत, अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली. उपस्थितांचे स्वागत वसंत भोईर यांनी, प्रास्ताविक दीपक बेहेरे, तर सूत्रसंचालन राजेश भगत यांनी केले.

या कार्यक्रमास नगरसेवक बळवंत घुमरे, विशाखा जिनगरे, स्वामिनी मांजरे, बिनीता घुमरे, माजी नगरसेवक अरविंद शेलार, प्रदीप घावरे, आकाश चौधरी, राजेश चौधरी, मृणाल खेडकर, स्नेहा गोगटे, प्रकाश पालकर, शर्वरी कांबळे, श्रद्धा कराळे, दिनेश सोळंकी, मारुती जगताप आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

लोकाभिमुख नेतृत्व असलेले कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांचा शुक्रवारी ४८वा वाढदिवस होता. युवकांपासून वृद्धांपर्यंत आमदार प्रशांत ठाकूर यांची क्रेझ कायम पहायला मिळते. ही अफाट लोकप्रियता त्यांनी आपल्या विधायक कार्यातून प्राप्त केली आहे. सलग तीनवेळा आमदार होऊनसुद्धा त्यांच्या वर्तनात कधीही बडेजाव दिसला नाही. त्यामुळे त्यांचे लाखोंच्या संख्येने हितचिंतक आहेत. वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांचे राज्यभरातून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक, वैद्यकीय, विधितज्ज्ञ, पत्रकारिता, विविध संस्था, संघटना, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी, हितचिंतकांनी अभीष्टचिंतन केले.

निरनिराळ्या क्षेत्रांत आमदार प्रशांत ठाकूर यांचे भरीव योगदान आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वसा त्यांनी अंगिकारला आहे. सर्व समाजाच्या विकासाचा ध्यास घेऊन ते दिवसातून १८ तास काम करीत असतात. त्यामुळे वाढदिवसानिमित्त सेवाव्रती आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शुभेच्छांचा वर्षाव झाला. वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, कृष्णाशेठ ठाकूर, पनवेल मनपा आयुक्त गणेश देशमुख, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, युवा मोर्चा द. रायगड अध्यक्ष अमित घाग, माजी प्रांताधिकारी दत्तात्रेय नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त देविदास सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक रवींद्र दौंडकर, न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे महेश भटे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# नावडे गावाजवळ कॉन्व्हेक्स सेफ्टी मिरर

### भाजप युवा नेते दिनेश खानावकर यांचा पुढाकार

**कळंबोली : प्रतिनिधी**

पनवेल-मुंब्रा महामार्गावर नावडे गावाजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलामुळे गावात रस्ता ओलांडताना अंडरपासमधून जावे लागते. त्यामुळे रस्त्यावरून येणाऱ्या गाड्या दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे जीवितहानी टळावी म्हणून भाजपचे युवा नेते दिनेश खानावकर यांनी स्वखर्चातून कॉन्व्हेक्स सेफ्टी मिरर बसविले आहेत. त्यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

या मार्गावर सातत्याने वर्दळ सुरू असते. नावडे गावच्या बाजूलाच औद्योगिक वसाहत असल्याने अवजड वाहनांची वाहतूक जास्त आहे. त्यामुळे सतत होणाऱ्या वाहतूककोंडीने हैराण असलेले वाहनचालक रस्ता मिळेल, तशी वाहने चालवत असतात. त्यामुळे अपघात होण्याची भीती आहे. या समस्येवर उपाय म्हणून दिनेश खानावकर यांनी स्वखर्चातून दोन्ही बाजूस कॉन्व्हेक्स सेफ्टी मिरर बसविले आहेत.



### दुखवटा

#### दिनेश पोरे



**उरण :** तालुक्यातील आंबिलवाडी येथील दिनेश दत्तात्रेय पोरे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५६ वर्षांचे होते. त्यांचा दशक्रिया विधी ११ ऑगस्ट रोजी उरण येथे, तर उत्तरकार्य १४ ऑगस्ट रोजी आंबिलवाडी येथे होणार आहे. कै. दिनेश पोरे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, दोन भाऊ, जावई, नात असा परिवार आहे.

#### मधुकर गायकवाड



**महाड :** दलितमित्र मधुकर गायकवाड यांचे ७२व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. ते मूळचे पाचाडचे (ता. महाड) रहिवासी होते. मुंबई येथे घरी असताना त्रास जाणवू लागल्याने रुग्णालयात दाखल केले असता त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, एक झुंझार आणि रोखठोक नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्याचे आमदार भरत गोगावले यांनी शोक व्यक्त करताना म्हटले आहे.



महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**

सर्व ग्राहकांना कळविण्यात येते की, ४००केव्ही ग्रहण केंद्र, खारघर उपकेंद्रात **दिनांक ०६.०८.२०२२** रोजी सकाळी ८:०० वाजेपासुन **दिनांक ०७.०८.२०२२** रोजी रात्री १२ वाजेपर्यंत अत्यंत महत्वाचे तांत्रिक कामाकरिता रोहित्र क्र. २ बंद करण्यात येईल. या कालावधीत वीज पुरवठा अखंडित राहील, मात्र आकस्मित स्थिती उद्भवल्यास कामोठे सेक्टर ८,९,१०,११,१८,१९,३४,३५ या भागातील विद्युत पुरवठा खंडित होऊ शकतो. तरी ग्राहकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कंपनीस सहकार्य करावे.

सही/-
**(संजय ओंकार काटकर)**
**कार्यकारी अभियंता**
**४०० केव्ही ग्र. के, खारघर**






**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. ६ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

**ग्रामीण लसीकरण**

■ धरणा ■ चाळ/नागझरी ■ ढोंगऱ्याचा पाडा ■ बीड/खुटारी/एकटपाडा ■ सिद्धी करवले ■ भिंगारी

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

# नवीन पनवेलमध्ये रक्तदान शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे विविध मान्यवरांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळ व पनवेल येथील रुधिर सेतू चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने शुक्रवारी (दि. ५) नवीन पनवेल सेक्टर १४ येथील चांगू काना ठाकूर विद्यालय येथे खारघरच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिर झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे, सुभाष भुजबळ, सुशीला घरत, तेजस कांडपिळे, विद्याताई गायकवाड, जगदीश घरत, विजय म्हात्रे, राकेश भुजबळ, क्रांतीकुमार चितळे, प्रशांत फुलपगार, हेमंत भुजबळ, प्रशांत भुजबळ, अजित लोंढे, किशोर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तसेच रुधीर सेतू चॅरिटेबल ट्रस्ट यांसकडून अरुण गदरे, मुरलीधर डाके, नरेंद्र कुमार दसरे, सुरेश रेसबुड, उज्ज्वला भिसे, प्रतिभा खन्ना आणि भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि सदस्य उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरासाठी १०१ रक्तदात्यांनी सहभाग घेतला, तसेच महिलांचाही चांगला प्रतिसाद मिळाला.

(छाया : चेतन पोपटा)



**पनवेल : भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त एसआरएस ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय सोनावणे, संचालक स्वराज सोनावणे, ॲड. मनोज म्हात्रे, ॲड. चंद्रकांत मढवी, पत्रकार संजय कदम आदींनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : इंडसइंड बँकेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सत्यनारायण पुजेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी बँकेचे डेप्युटी मॅनेजर दिलीप संकपाळ, मॅनेजर रवींद्र चौहान, रिजनल हेड प्रवीण ओभन आदी उपस्थित होते.**

## सीकेटी विद्यालयात स्पर्धा आणि वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना तसेच सहशालेय उपक्रम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ५) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यालयात भित्तीपत्रक स्पर्धा व शुभेच्छापत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त हर घर तिरंगा या उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



त्याचप्रमाणे विद्यालयातील एनएसएस युनिटतर्फे शिरढोण येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या वाड्यामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी शिरढोण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय भोपी, माजी सदस्य प्रमोद कर्णेकर, ग्रामपंचायत कोअर कमिटी सदस्य श्याम पवार, मयुरेश पवार ग्रामस्थांच्या हस्ते ४० वृक्षांची तसेच फुलझाडांची लागवड करण्यात आली. मंदार जोग यांनी आद्य क्रांतिकारकांचे चरित्र आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांसमोर उभे केले.



एनएसएस युनिटचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील, गणेश पाटील, संगीता देशमुख यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

संस्थेचे सचिव सिद्धेश्वर गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, इंग्रजी माध्यमिक विभाग मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी माध्यमिक विभाग प्रभारी मुख्याध्यापक कैलास सत्रे, मराठी प्राथमिक विभाग मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, मराठी माध्यमिक विभाग पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग पर्यवेक्षिका संध्या अय्यर, उच्च माध्यमिक कला विभाग पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान व वाणिज्य विभाग पर्यवेक्षक प्रशांत मोरे तसेच उपस्थित सर्व शिक्षकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## ऋषीवन वृद्धाश्रमात अन्नदान, वस्त्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल येथील ऋषीवन वृद्धाश्रम येथे उत्तर रायगड भटके विमुक्त आघाडीच्या वतीने अन्नदान आणि वस्त्रदान करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.



या वेळी भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, महिला आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा विद्या तामखडे, युवा अध्यक्ष डॉ. पवनकुमार पवार, आघाडीचे जिल्हा सहसंयोजक उत्तम जरग, सहसंयोजिका निता मंजुळे, कळंबोली शहराध्यक्ष आबासाहेब घुटुकडे, दिलीप बिष्ट, कामोठे शहर युवा संयोजक सागर पाटील, कामोठे शहर संयोजिका वैशाली देवढे, जयश्री पाटील, नूतन आलदर, कोमल ओवे, बायजा बारगजे, हेमलता घोडके, पनवेल सहसंयोजिका मिनाक्षी गीते आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये बूस्टर डोस शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोविड लसीकरण अमृत महोत्सव आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तथास्तू हॉलमध्ये बूस्टर डोस शिबिर शुक्रवारी (दि. ३) आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.





देशात १५ ऑगस्टला भारताचा ७५वा स्वातंत्र्यदिन साजरा होणार आहे. त्यानिमित्त १५ जुलैपासून पुढील ७५ दिवस कोविड लसीकरण अमृत महोत्सव साजरा करण्यात येणार असून १८ वर्षांवरील नागरिकांना मोफत बूस्टर डोस देण्यात येणार आहेत.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका रुचिता लोंढे, निता माळी, भाजप सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, अक्षया चितळे, अंजली इनामदार, सुहासिनी केकाणे, नंदा ओझे, संजय जैन, प्रविण मोहकर, अमित ओझे, गुरुनाथ लोंढे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला.

## महिला सक्षमीकरण योजनांचा लाभ घ्यावा –एकनाथ देशेकर

**कळंबोली : प्रतिनिधी**

सरकारच्या महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या सर्व योजनांचे प्रशिक्षण जागृती स्वयंरोजगार सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. त्यातून प्रशिक्षण घेणाऱ्यांना मोफत साहित्याचे वाटप केले जाईल. तेव्हा महिलांनी यासाठी पुढे यावे, असे आवाहन भाजपचे रायगड जिल्हा ओबीसी सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष एकनाथ देशेकर यांनी केले.



कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त हनुमानगर, चिंध्रण येथे मोफत संगणक व शिलाई मशिन क्लासचे उद्घाटन एकनाथ देशेकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, आम्ही जागृती स्वयंरोजगार सेवाभावी संस्था, आरीन फाउंडेशन व आध्याम सोशल फाउंडेशनच्या वतीने स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण केंद्र चिंध्रण हनुमान नगर येथे सुरू करण्यात आले आहे. महिलांना कच्चा माल देण्यात येईल, त्यांनी तयार केलेला माल बाजारात विकण्याचे कामही या संस्थांकडून केले जाईल. माल तयार करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्रीही दिली जाईल.

आरिन फाउंडेशचे प्रकल्प अधिकारी किरण जाधव यांनी योजनांची माहिती दिली. जागृती स्वयंरोजगार संस्था, आरीन फाउंडेशनच्या कायावती गोंधळी यांनी शासनाच्या सर्व योजनांची माहिती देऊन सहकार्याचे आश्वासन दिले. या वेळी महिला बचत गटाचे पदाधिकारी निता घरात, निलन बोंडे, अर्चना ठोंबरे, चंद्रभागा पाटील, मंदा देशेकर उपस्थित होत्या.



## हर घर तिरंगा अभियानासंदर्भात बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या ७५व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येणार आहे. त्यानुसार १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान प्रत्येकाने आपल्या घरात राष्ट्रध्वज फडकवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत भाजप पनवेलच्या वतीने प्रभाग क्र. १४ ते २०मधील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक गुरुवारी (दि. ४) पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाली.

हर घर तिंरगा अभियानासाठी देशभरात जोरदार तयारी सुरू झाली आहे. प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वातंत्रलढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, ज्यांनी देशासाठी बलिदान दिले त्यांचे स्मरण व्हावे, देशाप्रती भक्तीसह, कृतज्ञतेची जाणीव वृद्धींगत व्हावी या उद्देशाने १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान देशभरात हर घर तिरंगा अभियान उपक्रम राबवून घराघरात राष्ट्रध्वज फडकविण्यात येणार आहे. या अभियानाच्या पार्श्वभूमिवर भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने प्रभाग क्र. १४ ते २०मधील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक झाली असून, या बैठकीत हर घर तिरंगा अभियानाबाबात जनजागृती करण्यासाठी सूचना देण्यात आल्या व सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले.

या बैठकीला माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष सुनिल घरत, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पनवेलकरांची साथरोग तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मनपा क्षेत्रातील प्रभाग क्र. १८ येथील वाल्मिकीनगर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर भाजप शहर सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप पनवेल शहर सोशल मीडिया सेल, शहर संयोजक प्रसाद हनुमंते व उत्तर रायगड ओबीसी युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे यांच्यातर्फे भरवण्यात आले. या वेळी कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सफाई कामगार संपूर्ण पनवेल नगराची साफसफाई करून रहिवाशांच्या तब्येतीची निगा राखण्याचे काम करीत असताना त्यांच्या तब्येतीकडे मात्र दुर्लक्ष होत असते. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आरोग्य तपासणी शिबिर भरविण्यात आले असल्याचे माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, श्वेता खैरे, मंजुळे, उत्तर रायगड ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेश गायकर, युवा नेते दशरथ म्हात्रे, प्रीतम धनाजी म्हात्रे, गौरव कांडपिळे, उमेश इनामदार, महेश सरदेसाई, प्रसाद कंधारे आदी उपस्थित होते. पनवेल महापालिका आरोग्य अधिकारी म्हणून डॉ. अमेय राठोड, डॉ. अनमोल ठाकूर, डॉ. कांचन तांदळे तसेच तेरणा हॉस्पिटलचे डॉ. अजित निळे यांचे व त्यांच्या संपूर्ण टीम विशेष सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी होण्यासाठी येथील कार्यकर्ते सागर मंगवाणी, सनी बेद, महेश सरदेसाई, प्रसाद कंधारे, पंडित, यतीन रावल व अन्य कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले.









**कळंबोली : कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप कळंबोली मंडळतर्फे रोडपली जि. प. शाळा व महाराष्ट्र शाळेमध्ये वह्यावाटप व गणपती विसर्जन तलावाच्या बाजूला वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमांचे नियोजन कळंबोली मंडळ अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी केले होते. या वेळी माजी सभापती प्रमिला पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, राजू शर्मा, जिल्हा सचिव रमेश नायर, उपाध्यक्ष युवा मोर्चा अमर ठाकूर, मंडल सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकाम, सरचिटणीस दुर्गा शहाणी, उत्तर भारतीय मोर्चाध्यक्ष केशव यादव, मंडळ उपाध्यक्ष संदीप भगत, जोहेब पटेल, देविदास खेडकर, मच्छिंद्र कुरुंद, लैला शेख, राणी रणपुरे, नेहरू रणपुरे, दीपक दुधावले, कल्पेश वैद्य आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# महागाईचा आडोसा

ईडीच्या कारवायांविरोधात काँग्रेस पक्षातर्फे देशभर आंदोलने करण्यात आली खरी, परंतु त्याला पुरेशी धार नव्हती. अखेर ईडीचा मुद्दा थोडा मागे टाकून महागाईच्या आडोशाआड दडून कुटिल कारवाया करण्याचे उद्योग काँग्रेस नेत्यांनी आता सुरू केले आहेत. शुक्रवारी त्याचे प्रत्यंतर आले.

**सक्तवसुली संचलनालय म्हणजेच ईडीने सुरू केलेल्या चौकशीचे निरनिराळे पडसाद भारताच्या राजकारणात बघायला मिळत आहेत. काही वर्षांपूर्वी ईडी म्हणजे काय हे देखील कोणाला माहित नव्हते अशी टीका मध्यंतरी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांतर्फे उपहासाने केली जात होती. परंतु विरोधकांच्या या प्रतिक्रियेत तथ्य मात्र नक्कीच आहे. कारण काही वर्षांपूर्वीपर्यंत ईडी हे प्रकरण फारसे कोणाला खरोखरच माहित नव्हते. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले तेव्हापासून ईडीचे चटके काही जणांना बसू लागले आहेत. भ्रष्टाचाराबाबत सहनशीलता आणि सहानुभूती दाखवली जाणार नाही अशी ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी सुरूवातीलाच दिली होती, त्यानुसारच भाजप सरकारची पावले पडत आहेत. जनतेला हेच हवे होते आणि त्यासाठीच सत्तापालट करून पंतप्रधानपदी मोदी यांची निवड करण्यात आली होती. गेल्या तीन–चार वर्षांत मात्र या ईडीनामक तपासयंत्रणेने भल्याभल्यांच्या झोपा उडवल्या आहेत. महाराष्ट्रात ईडीच्या कारवाईमुळे मंत्रीमहोदय गजाआड झाले आणि एका राजकीय पक्षाचा प्रवक्ता बराच काळ भोंगा वाजवल्यानंतर ईडीच्या कोठडीत रवाना झाला आहे. राष्ट्रीय पातळीवर नॅशनल हेराल्ड प्रकरणी थेट गांधी परिवारालाच ईडीच्या तपास अधिकाऱ्यांनी आरोपाच्या फेऱ्यात घेरले आहे. काही दिवसांपूर्वी नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांची ईडीने तीन दिवस चौकशी केली होती. त्याआधी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांचीही कसून चौकशी झाली होती. या दोघांच्याही आधी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वडेरा यांचे पती रॉबर्ट वडेरा यांना देखील ईडीच्या मुख्यालयात चौकशीसाठी वाऱ्या कराव्या लागल्या होत्या. गांधी परिवाराशी संबंधित कुणालाही ईडीच्या तपासाचे समन्स आले की काँग्रेस जन चवताळून रस्त्यावर उतरतात. दरवेळी असेच घडत आले आहे. वास्तविक तपासयंत्रणांना सहकार्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. परंतु सहकार्य सोडाच एका परिवाराला वाचवण्यासाठी संसद वेठीला धरण्यापर्यंत काँग्रेस खासदारांची मजल गेली. पुन्हा ईडीचा मुद्दा मागे टाकून महागाईच्या मुद्दयावर काँग्रेसतर्फे शुक्रवारी काळा दिवस पाळण्याचे आवाहन करण्यात आले. अपेक्षेप्रमाणे त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. राजधानी दिल्लीत मात्र गांधी परिवाराच्या सदस्यांनी काळे कपडे परिधान करून तुरळक कार्यकर्त्यांसह आंदोलन छेडण्याचे नाटक केले. प्रियांका गांधी यांनी तर पोलिसांचा वेढा मोडून बॅरिकेडवर चढून ठिय्या आंदोलन केले. त्यांना ताब्यात घेताना महिला पोलिसांना बरीच कसरत करावी लागली. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना देखील दिल्ली पोलिसांनी काँग्रेस मुख्यालयाबाहेरच ताब्यात घेतले. काँग्रेसचे दुसरे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांना देखील ईडीने चौकशीसाठी समन्स बजावले आहे. संसद चालू असताना अशा प्रकारे समन्स बजावणे अन्यायकारक आहे अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी नोंदवली. परंतु ईडीसारखी स्वायत्त तपास यंत्रणा आरोपीची सोय बघून कारवाया करत नसते हे खरगे यांना माहित असायला हवे होते. महागाईबद्दल काँग्रेसला आलेला पुळका म्हणूनच खोटा आणि बेगडी वाटतो आहे.**

# मुंबई-गोवा महामार्गाकडे प्रशासनाने लक्ष द्यावे



## खबरबात
**धम्मशील सावंत**

मुंबई–गोवा महामार्ग चौपदरीकरण या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत पळस्पे ते पत्रादेवीपर्यंत एकूण ४७१ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचा समावेश आहे. त्यापैकी पळस्पे ते इंदापूर (८४ किमी) हा पहिला टप्पा आहे. मागील सहा ते सात वर्षांपासून सुरू झालेल्या या पहिल्या टप्प्याच्या कामाने अद्यापही गती घेतलेली नाही. याला संबधित प्रशासन जबाबदार आहे. याबरोबरच इंदापूर ते कशेडी (७७ किमी) हा चौपदरीकरणाचा पुढील टप्पा आहे. या टप्प्याच्या रुंदीकरणाचे काम मागील दीड ते दोन वर्षांपासून सुरू झाले आहे. हे दोन्ही टप्पे रायगड जिल्ह्यातून जातात. मृत्यूचा सापळा म्हणून ओळखला जाणारा हा महामार्ग केव्हा सुधारणार याकडे साऱ्यांचे डोळे लागून राहिले आहेत. याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. दरम्यान, गणेशोत्सवात मुंबई–गोवा महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना यंदाही आपली वाहने नेताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

मुंबई–गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्याचे चौपदरीकरणाचे काम मागील अनेक वर्षांपासून सुरू आहे. सध्या या महामार्गाची अवस्था अत्यंत बिकट आहे. महामार्गासाठी कोट्यवधींचा निधी आला, पण प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे आज या मार्गाची दुरवस्था झाली आहे. महामार्गाच्या दुरवस्थेबाबत माध्यमांनी सातत्याने व्यथा मांडली आहे. महामार्गावर सुरू असलेल्या रुंदीकरण कामाबाबत आणि पडलेल्या खड्ड्यांबाबत जनतेत असंतोषाची लाट आहे. गेली अनेक वर्षे महामार्गाचे काम सुरू आहे. मागील वर्षी गणेशोत्सव उत्सवावेळी खड्डेमय रस्त्याने चाकरमानी गेले. दरम्यान, आतातरी प्रशासनाने मुंबई–गोवा महामार्गाकडे लक्ष देऊन प्रवाशांना दिलासा द्यावा अशी जनतेने शासनाकडे मागणी केली आहे.

मुंबई–गोवा महामार्गावरील पेण, नागोठणे, माणगाव, महाड़, पोलादपूर येथील जीवघेण्या परिस्थितीचा प्रवाशी, रुग्णांना मोठा फटका बसतोय. मोटारसायकलस्वार यांची तर परिस्थिती अत्यंत बिकट असून त्यांचा प्रवास अक्षरशा मृत्यूच्या जबड्यातून होतोय. मात्र महामार्गाच्या कामात सुधारणा होत नाही याबाबत कोकणवासीय जनतेसह पर्यटक, स्थानिक नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. नवीन सरकारकडून बऱ्याच अपेक्षा पूर्ण होतील अशी जनतेला खात्री आहे.

विविध रस्ते व दळणवळणाची साधने गतिमान होण्याबरोबर पुलांची कामे, जोडरस्ते होण्याच्या दृष्टीने आवश्यक तो निधी लवकरच प्राप्त होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

या महामार्गावर अनेक ठिकाणी साईडपट्ट्या तसेच रिफ्लेक्टर व पांढरे पट्टे नसल्याने वाहनचालकांना रात्रीच्या वेळी वाहन चालविताना अडथळा येतो. महामार्गावर खड्डे बुजविण्यासाठी सातत्याने टाकण्यात येणारी मुरूम व माती यामुळे चिखलाची समस्या अधिक वाढली आहे. रोगापेक्षा इलाज भयंकर अशी परिस्थिती दिसून येत आहे. पावसामुळे या मार्गावर आता काही ठिकाणी मोठाले खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी हे खड्डे अर्धा फुटापेक्षाही जास्त आहेत. खड्ड्यात पाणी साचल्याने खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने मोटारसायकलस्वार कोसळण्याच्या घटनांत वाढ झाली आहे तसेच मोठ्या खड्ड्यांमध्ये वाहन आपटून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. या मार्गावरील प्रवास म्हणजे जणू नौका नयनाचा प्रवास असल्याचा अनुभव येतोय. रुग्णांचे तर हाल होतातच, मात्र गर्भवती महिलांची अवस्था अत्यंत बिकट होत आहे.

मागील वर्षीदेखील या रस्त्याची पुरती चाळण झाली होती. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता हे समजत नाही. यावर्षी काही ठिकाणी रस्ता अजुन सुस्थितीत आहे. परंतू कामाचा दर्जा, अवजड वाहने आणि मुसळधार पाऊस यामुळेदेखील रस्त्याचा टिकाव लागला नाही. त्यामुळे वाहनचालक व प्रवाश्यांना यंदाच्या पावसाळ्यात सुद्धा खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे.

ठिकठिकाणी गावाजवळ बायपास पुलाचे काम सुरु असून अपूर्ण कामांमुळे प्रवाशी व वाहनचालकांना मोठा त्रास होत आहे. महामार्गाच्या कामात कोणत्याही प्रकारची सुरक्षा बाळगली जात नाही असे लोकांचे म्हणणे आहे. प्रवाशीवर्गाला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. महामार्गावर अनेक ठिकाणी लेनचे काम करण्यासाठी रस्ता दुभागण्यात आला आहे. ज्या–ज्या ठिकाणी अशाप्रकारे रस्ता दुभागण्यात आला आहे तेथे खड्डे पडले आहेत. किंवा तेथील खडी व डांबर निघाले आहे. त्यामुळे अशा दुभाजकाच्या मार्गावरुन जाताना वाहन चालकांची गैरसोय होत आहे. तसेच अनेक वेळा वाहने येथून घसरतात व अपघाताचा धोका निर्माण होतो.

महामार्गावर अनेक ठिकाणी पक्की साईड पट्टीच नाही. अनेक ठिकाणी साईड पट्टीवर खड्डे पडेल आहेत, चिखल झाला आहे. तर काही ठिकाणी गवत उगवले आहे. यामुळे महामार्गावर वाहनचालकांना गाडी रस्त्याच्या शेजारी नेतांना अडचण येते. बऱ्याच वेळा ओव्हरटेक करताना या साईड पट्टीवर फसून वाहने कलंडून अपघात होतो. चौपदरीकरणाचे काम सुरु असल्याने या मार्गावर पांढरे पट्टे किंवा रिफ्लेक्टर बसविले गेलेले नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. पावसाळ्यात तर वाहनचालकांना रस्ता दिसत नाही. त्यामुळे अनेक वेळा अपघात घडतात. शासनाने दिलेला आणि जनतेचा कर रूपी पैसा वाया जातोय याबाबत कोकणवासीय जनतेसह पर्यटक, स्थानिक नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

कोकणवासीयांना आणि प्रामुख्याने रायगडकरांना या महामार्गाचे चौपदरीकरण होणार म्हणून खूप आनंद झाला होता. महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे येथील पर्यटन व्यवसायाला नवी उभारी येईल. शिक्षण आणि नोकरी धंद्यासाठी मुंबई व इतर शहरांमध्ये दळणवळण करणे सोयीचे व सुलभ होईल. नवीन कारखाने आणि उद्योग व व्यवसाय विकसित होऊन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. भात, नारळ, सुपारी, काजू, फणस तसेच प्रक्रिया केलेला पदार्थ बाजारात नेणे सोपे होईल. एकूणच जिल्ह्यात आर्थिक सुबत्ता निर्माण होईल. लोकांचे दरडोई उत्पन्न वाढेल आणि शैक्षणिक स्तर उंचावून राहणीमानदेखील सुधारेल, इतके आमुलाग्र परिवर्तन मुंबई–गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाने होईल अशी आशा सर्वसामान्यांना आहे. मात्र प्रत्यक्षात प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळेच मुंबई–गोवा महामार्गाचे काम संथ गतीने सुरू आहे. अतिशय महत्त्वाचा असा राष्ट्रीय महामार्ग असलेल्या या महामार्गाची ही दयनीय अवस्था आहे. प्रत्येक पावसाळ्यात तर या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पहायला मिळत आहे. अपूर्ण व काही ठिकाणी कामाचा दर्जा, खड्डे, पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धूळ यामुळे प्रवाशी व स्थानिक पुरते हैराण झाले आहेत. वाहतूककोंडी सततची आहे. वारंवार या रस्त्याची डागडुजी करण्यात येते, मात्र पुन्हा जैसे थे!

महामार्गाच्या दुरवस्थेचा विपरीत परिणाम येथील उद्योग क्षेत्र व पर्यटन व्यवसायावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढेच काय तर खड्डे आणि खराब रस्त्यामुळे शेकडो जणांचे जीव गेले आहेत. असंख्य जण जखमी झाले आहेत. एकूणच स्थानिक, प्रवासी आणि चाकरमानी या दुरवस्थेमुळे पुरते वैतागले आहेत. दरवर्षी गणेशोत्सवात या महामार्गावरून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या त्रासाला सीमाच नसते.

नव्याने आलेले सरकार या मार्गाच्या सुस्थितीसंदर्भात काही तरी करेल अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे, कारण राज्यातील आधीच्या सरकारने याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे नवीन सरकारने महामार्गाबाबत कामे जलद आणि वेळेत पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे, अशी जनतेची मागणी आहे. याबाबत सामान्य नागरिक सोशल मीडियावरही लक्ष वेधू लागले आहेत.



## बदलते तंत्रज्ञान



### अँड्रॉइडवरून युट्यूबवर व्हिडीओ असा करा अपलोड

आज आपण जाणून घेणार आहोत काही सोप्या टिप्स की ज्या फॉलो केल्याने तुम्ही तुमचा व्हिडीओ युट्यूबवर अपलोड करू शकता. स्मार्टफोनच्या आगमनापासून, लोकांना फोनवर गेम आणि व्हिडीओ पाहणे खूप आवडते. पण गेल्या काही दिवसांमध्ये तुम्ही पाहिले असेल की




व्हिडीओ स्ट्रीमिंगची मागणीही खूप वाढली आहे. लोक युट्यूबवर त्यांचे आवडते व्हिडीओ पाहत राहतात. तुम्हीही तुमचा व्हिडिओ अपलोड करू शकता जो संपूर्ण जगाला दिसेल. आज आपण जाणून घेणार आहोत काही सोप्या टिप्स की, ज्या फॉलो केल्याने तुम्ही तुमचा व्हिडीओ युट्यूबवर अपलोड करू शकता. हे काम तुम्ही तुमच्या अँड्रॉइड फोनद्वारे सहज करू शकता. तुम्हाला तुमच्या अँड्रॉइड फोनवरून तुमचा व्हिडीओ अपलोड करायचा असेल, तर तुमचे जीमेल खाते फोनमध्ये इंटिग्रेटेड असणे आवश्यक आहे. म्हणजेच, तुमचे जर जीमेल खाते आधीपासून असेल तर चांगलेच आहे. नसेल तर जीमेल खाते तुम्ही त्यावेळी एक तयार करू शकता. यासाठी खालील टिप्स फॉलो करा. एकदा तुमचे जीमेल खाते झाले की, तुम्ही तुमच्या अँड्राइडवरून व्हिडिओ सहज अपलोड करू शकता. यासाठी, सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या फोनवर युटूब ॲप्लिकेशन उघडावे लागेल. युट्यूब उघडल्यानंतर तुम्हाला खाते बटणावर क्लिक करावे लागेल. खाते बटणावर क्लिक केल्यानंतर, तुम्हाला माय व्हिडिओवर जावे लागेल. येथे तुम्हाला वर अपलोड केलेल्या व्हिडिओचे चिन्ह दिसेल. त्याला क्लिक करावे लागेल. याच्या मदतीने तुम्हाला तुमच्या समोर फोन गॅलरीमध्ये उपलब्ध व्हिडिओ दिसतील, जे तुम्ही अपलोड करू शकता. शीर्षस्थानी व्हिडिओ रेकॉर्ड करण्याचा पर्यायदेखील असेल आणि आपण त्याचवेळी रेकॉर्ड केलेले तुम्ही व्हिडिओ निवडताच, तो तुमच्या युटूबवर दिसेल. येथून तुम्ही व्हिडिओची लांबी वाढवू किंवा कमी करू शकता. म्हणजेच, तुम्हाला किती सेकंदांचा किंवा मिनिटांचा व्हिडिओ टाकायचा आहे हे तुम्ही ठरवू शकता. तळाशी, तुम्ही तुमच्या व्हिडिओचे शीर्षक आणि वर्णन टाकू शकता. शीर्षकामध्ये तुम्हाला नाव टाकावे लागेल ज्याखाली व्हिडिओ प्रदर्शित केला जाईल आणि वर्णनात व्हिडिओबद्दल थोडी माहिती द्यावी लागेल. तुमचा व्हिडीओ तुमच्या युट्यूबवर अपलोड आणि प्रकाशित होईल.

# सुप्रसिद्ध लेखिका योगिनी जोगळेकर



योगिनी जोगळेकर यांच्यावर बालपणापासून विविध कलांचे संस्कार झाले. त्यांचा जन्म पुणे येथे ६ ऑगस्ट १९२५ मध्ये झाला. त्यांच्या एकूणच लेखनप्रवासाचा घेतलेला हा आढावा.

पुणे येथे हुजूरपागा शाळेत मॅट्रिकपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. वयाच्या केवळ आठव्या वर्षीच त्यांची कवितेशी गट्टी जमली. पहिली कविता शाळेच्या 'बालिकादर्शन'मध्ये छापून आली. शिक्षण घेत असताना संगीत, लेखन, अभिनय, वक्तृत्व, चित्रकला अशा अनेक अंगांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरत गेले. संस्कृत आणि मराठी घेऊन त्या स. प. महाविद्यालयातून बी. ए. ला पहिल्या आल्या. त्यावेळी त्यांना 'यशोदा चिंतामणी', 'कुसुम वाघ', 'विंझे' ही तीन मानाची पारितोषिके मिळाली. १९४८ ते १९५३ या काळात पुण्यातील सरस्वती मंदिरात शिक्षिका म्हणून त्यांनी काम केले. महाविद्यालयात असताना तंबोरा बक्षीस म्हणून मिळाले आणि पुढे त्या गायिका झाल्या. दरम्यान, जोगळेकर यांचा मूळचा पिंड साहित्यात रमणारा होता. त्यांनी चाळीस कादंबऱ्या, बावीस कथासंग्रह, चार कवितासंग्रह, बारा बालवाङ्मयसंग्रह, तीन नाटके, एक चरित्र अशी विपुल साहित्य सेवा केली. त्यांचे लेखन बहुढंगी असले, तरी प्रामुख्याने कुटुंब, कुटुंबातील व नाते संबंधांतील ताणतणाव, संघर्ष यांना वेढून असणारे होते, त्यामुळे त्याला अतिशय लोकप्रियता लाभली. त्यांचे लेखन वाचकांना आपले, जिव्हाळ्याचे वाटले. त्यांच्या कथेत सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तींचा संघर्ष दिसतो.

बहुतेक कथांतील स्त्रिया सोशिक, सात्त्विक, प्रेमळ व भाबड्या, हसतमुख आणि त्यागमूर्ती दिसतात. त्यांच्यातील कवयित्रीचे प्रतिबिंब त्यांच्या कथा कादंबऱ्यातून दिसून येते. काही कथांमध्ये त्यांनी कविताही लिहिल्या आहेत. त्यांच्या काव्यात्मकवृत्तीचा मनोहर आविष्कार कथांतून झालेला आढळतो. त्यांनी आपला पहिला कथासंग्रह 'झुंजूमूंजु' आईला आणि वडिलांना अर्पण केला, कारण तेच त्यांचे पहिले वाचक आणि समिक्षक होते. त्यांचे 'उलट–सुलट', 'श्रावण', 'शर्यत', 'प्रतीक', 'ओटी', 'प्राची', 'उर्मी', 'पाझर', 'शिलगंण', 'आविष्कार', 'देणगी', 'उपहार', 'जाण', 'मौन', 'अप्रुप' इत्यादी कथासंग्रह विशेष उल्लेखनीय आहे.

एका खासगी कथाकथन कार्यक्रमात 'शिलांगण' ही कथा ऐकताना प्रसिद्ध लेखक पु. भा. भावे यांचे डोळे ओलावले. ही कथेला मिळालेली पावतीच होय. 'नन्या आईसफ्रुटवाला' या कथेसाठी आचार्य अत्रे यांनी त्यांची पाठ थोपटली. त्यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखांनी जीवनसंघर्ष करायला अनेकांना उद्युक्त केले तर कोणाला जीवन जगायला शिकवले. सोलापूरची एक तरुणी छळाला कंटाळली होती, पण 'गुलबक्षी' कादंबरीतील नायिकेने तिला सावरले. 'वादळफूल', 'नादब्रह्म', 'प्राजक्ता', 'द्विदल', 'हार–जीत', 'पूर्ती', 'कसरत', 'तिढा', 'झुला', 'शह', 'कुणासाठी कुणीतरी', 'बावन्नकशी', 'चढ–उतार', 'निरागस', 'घरोघरी', 'सांगाती' इत्यादी कादंबऱ्या लक्षणीय ठरल्या. त्यांचे 'रिमझिम', 'सूरगंधा', 'आंबट–चिंबट', 'आलापिनी' हे चार कवितासंग्रह 'रामप्रहर' हे चरित्रलेखन तर 'गुरुशिष्य', 'तिळगुळ', 'खंडू खोडसाळे', 'फुलांचे झेले', 'वाकडी काकडी', इत्यादी कुमार वाङ्मय प्रसिद्ध आहे. विविध नाटके त्यांनी लिहिली. डॉ. भालेराव स्मृती पुरस्कार (मुंबई मराठी साहित्यसंघ), अमृत महोत्सवी (७५ वे) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन–स्त्री–लेखिका पुरस्कार हे त्यांना मिळालेले महत्त्वाचे पुरस्कार आहेत.

**– वि. ग. जोशी**




### क्लिक...क्लिक...!

**खालापूर : श्रावण महिन्यात मंदिरांत भाविकांची वर्दळ वाढली आहे. अष्टविनायकांपैकी एक असलेले तालुक्यातील महड येथील वरदविनायक गणपती मंदिरातदेखील विशिष्ट सजावट होत आहे. श्रावण महिना म्हणजे, व्रतवैकल्ये, अभिषेक, पूजा–अर्चा, विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात केले जाते. खालापूर तालुक्यातील हे ऐतिहासिक मंदिर असून या मंदिराचे खास वैशिष्ट्य आहे. नवसाला पावणारा अशी ख्याती असलेला महड वरदविनायक गणपती दर्शनासाठी वर्षाच्या बारा महिनेही भाविकांची गर्दी असते. (छाया : जयवंत माडपे)**

## आरोग्य प्रहर

### हार्मोन्स असंतुलनामुळे उद्भवू शकतात आरोग्याच्या समस्या!

शरीराच्या चांगल्या कार्यासाठी हार्मोन्सचे संतुलन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. हार्मोन्स ही अशी रसायने आहेत जी रक्ताद्वारे अवयव, त्वचा, स्नायू आणि इतर ऊतींमध्ये



संदेश वाहून शरीरातील विविध कार्यांचे समन्वय साधण्यास मदत करतात. हे सिग्नल तुमच्या शरीराला काय आणि कधी करावे हे सांगतात. हार्मोनल समस्यांमुळे सामान्य कामकाजावर परिणाम होऊ शकतो. पुरुष आणि स्त्रिया दोघांमध्ये हार्मोन्स असंतुलनामुळे वेगवेगळ्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळेच हा त्रास टाळण्यासाठी सर्वांनी सतत प्रयत्नशील राहावे.

हार्मोन्स आणि बहुतेक ऊती जे त्यांना तयार करतात आणि सोडतात ते तुमच्या अंतःस्त्रावी प्रणालीसाठी आवश्यक असतात. हार्मोन्स मेटाबॉलिझम, होमिओस्टॅसिस, शारीरिक विकास, लैंगिक कार्य, पुनरुत्पादन, झोपणे–जागण्याचे चक्र इत्यादिसारख्या विविध शारीरिक प्रक्रिया नियंत्रित करतात. असे असमतोल दूर करण्यासाठी सर्व लोकांनी असे उपाय सातत्याने केले पाहिजेत. अशा उपायांबद्दल जाणून घेऊया.

**हार्मोन्सच्या असंतुलनामुळे शरीरात निर्माण होणाऱ्या समस्या**

हार्मोन्सच्या असंतुलनामुळे शरीरात अनेक समस्या उद्भवू शकतात. अनेक असंतुलनांना उपचारांची आवश्यकता असते, काही तात्पुरत्या असू शकतात आणि स्वतःहून निघून जातात. मुरुम, मधुमेह, थायरॉईड, लठ्ठपणा ते वंध्यत्व यासारख्या समस्यांचे कारण हार्मोन्सचे असंतुलनदेखील असू शकते. अशा समस्या टाळण्यासाठी काही उपाय करणे गरजेचे आहे. यामध्ये सकस आहार घ्यावा. अत्यावश्यक संप्रेरकांच्या असंतुलनाची समस्या टाळण्यासाठी आहारावर विशेष काळजी घेतली पाहिजे. पौष्टिक आहार घेतल्यास शरीराच्या सर्व गरजा पूर्ण होण्यास मदत होते. फळे, भाज्या, मासे, चिकन आणि तृणधान्ये, फायबर, खनिजे आणि जीवनसत्त्वे असलेले इतर पदार्थ खाल्ल्याने हार्मोन्सचे संतुलन राखण्यास मदत होते. नियमितपणे योगा आणि व्यायामाची सवय लावून हार्मोन्सचा समतोल राखता येतो. रोज व्यायाम करण्याची सवय लावा. जॉगिंग किंवा चालणे, पोहणे, सायकल चालवणे यांसारख्या सवयीही यात तुम्हाला उपयुक्त ठरू शकतात. मन आणि शरीर शांत करण्यासाठी रोज ध्यानाचा सराव करावा. याकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

## दक्षिण रायगडात भाजप युवा मोर्चातर्फे हर घर तिरंगा अभियान

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वज सुपूर्द



(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्याला येत्या १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा अभियान सुरू केले आहे. त्यानिमित्ताने पनवेल येथे शुक्रवारी (दि. ५) रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या हाती तिरंगा झेंडा सुपूर्द केला.

दक्षिण रायगड जिल्ह्यामधील विविध तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या वेळी हर घर तिरंगा या अभियानांची माहिती देण्यात आली. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन युवा मोर्चाद्वारे करण्यात आले.

भाजयुमोचे जिल्हा अध्यक्ष अमित घाग, सरचिटणीस ॲड. जयदीप तांबुडकर, शिवाजी पाटील, युवा मोर्चा विद्यार्थी जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी, रोहा शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, सरपंच रघुनाथ कोस्तेकर, अमर वारंगे, संकेत मोरे, दिप वायडेकर यांच्यासह भाजप व युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

## खोपोलीत श्रवणयंत्र वाटप, नेत्रचिकित्सा शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खोपोली भाजपच्या वतीने शुक्रवारी (दि. ५) अल्प दरात श्रवणयंत्र तसेच नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उस्फूर्तपणे भेट देऊन लाभ घेतला.

खोपोलीतील ज्येष्ठ नागरिक सभेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या शिबिराचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात १०० नागरिकांनी श्रवणयंत्राचा लाभ घेतला.

भाजपचे खोपोली शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल व महिला मोर्चा शहराध्यक्ष शोभाताई काटे यांच्या हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी माजी नगरसेविका अपर्णा मोरे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूर नेतकर, उपाध्यक्ष चंद्रप्पा अनिवार, शहर सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, कामगार सेलचे सूर्यकांत देशमुख, युवा नेते सचिन मोरे, युवा मोर्चा शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विनायक माडपे, वैद्यकीय सेलचे डॉ. बबन नागरगोजे, विकास खुरपुडे, महिला शहर सरचिटणीस अश्विनी अत्रे, गोपाळ बावस्कर, राहुल जाधव, रसिका शेटे, गीता मोहिते, अनिता शहा, सिद्धेश पाटील, अनिल कर्णूक, सुधागड तालुका अध्यक्ष राजेश मापारा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खोपोली शहराच्या विविध भागात कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतनाचे होर्डिंग लावले होते.





(छाया : विनायक मांडपे)

## नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू करा

### खासदार बारणे यांचे रेल्वेमंत्र्यांना साकडे



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

नेरळ-माथेरान मिनीट्रेन पुन्हा सुरु करावी, तसेच या मिनीट्रेनच्या डब्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.



खासदार श्रीरंग बारणे यांनी नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांना मिनीट्रेन सुरु करण्याबाबत निवेदन दिले. गेली दोन वर्षे नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन बंद आहे. त्यामुळे हजारो कुटुंबांच्या रोजगारावर मोठा परिणाम झाला आहे. हॉटेल व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. माथेरानचे पर्यटन लक्षात मिनीट्रेन सेवा पुन्हा सुरु करावी, मिनीट्रेनला अतिरिक्त प्रवासी डब्बे जोडण्यात यावेत तसेच मिनीट्रेनचा युनोस्कच्या वर्ल्ड हेरिटेज ट्रेनमध्ये समावेश व्हावा, यासाठी प्रयत्न करावेत, अशा मागण्या खासदार बारणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडे केल्या.

## आरसीएफची वार्षिक उलाढाल १२ हजार ९४८ कोटींवर

**अलिबाग : प्रतिनिधी**

खत आणि रासायनिक उद्योग प्रवर्गातील प्रमुख कंपनी असलेल्या आरसीएफ प्रकल्पाला २०२१-२२ या आर्थिक वर्षात ९१५ कोटी १४ लाख इतर करपूर्व नफा मिळाला आहे. तर कंपनीची वार्षिक उलाढाल १२ हजार ९४८ कोटींवर पोहोचली आहे, अशी माहिती कंपनीचे मानव संसाधन आणि प्रशासन विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक एस. एम. कुलकर्णी यांनी दिली.

कोरोना काळात आव्हानात्मक परिस्थितीत कंपनीने ही कामगिरी केली आहे. आरसीएफच्या भविष्यकालीन योजना आणि प्रगतीसाठी नियमितपणे कार्यक्षमतेत सुधारणा करणे, उत्सर्जन कमी करणे व खर्चात बचत करून सयंत्रांची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी अद्ययावतीकरण आणि विस्तार प्रकल्प विचाराधीन आहेत. ज्यामधे थळ येथे एनपीके/डीएपी खतांच्या प्रकारांचा नवीन प्रकल्प उभारणीचा संकल्प असून तो सरकारी प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेतंर्गत आहे.

आरसीएफ आपल्या दोन्ही उत्पादन युनिटमध्ये आयएसओ मानांकनांतर्गत येणाऱ्या सर्व व्यवस्थापन प्रणाली (आयएमएस) चा अवलंब करत आहे. कंपनीला विविध श्रेणींमध्ये प्रामुख्याने ऊर्जा संवर्धन, पर्यावरण, सुरक्षा, आरोग्य तसेच उत्पादन वाढीसाठी सरकारी तसेच इतर नामांकित संस्थांकडून गौरवण्यात आले असून अनेक राज्य व राष्ट्रीय पातळीवरचे पुरस्कार मिळालेले आहेत. कंपनी व्यवस्थापन आपल्या कारखान्याच्या परिसरात स्वच्छ पर्यावरण व सुरक्षितता राखण्यासाठी निरंतर प्रयत्नशील असून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे, सौर ऊर्जेवर आधारित शाश्वत वीज वितरण इ. उपक्रम हाती घेतले आहेत.

निगमित सामाजिक दायीत्व उपक्रमांतर्गत (सीएसआर) कंपनीने गरजूंना सेवा देण्याच्या उद्देशाने अनेक लोकोपयोगी प्रकल्प राबवलेले आहेत. गतवर्षी कंपनीने सीएसआर उपक्रमांवर केलेल्या एकूण खर्चापैकी सुमारे ७० टक्क्यांहून जास्त निधी थळ कारखाना परिसरातील विविध समाजोपयोगी उपक्रमांसाठी वापरलेला आहे. यात अलिबाग येथील जिल्हा रुग्णालया अंतर्गत नऊ प्राथमिक आरोग्य केंद्रांना अद्ययावत वैद्यकीय सुविधा आणि वैद्यकीय उपकरणांचा पुरवठा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाला ऑक्सिजन प्लांटसाठी अर्थसहाय्य, आसपासच्या गावांना पिण्याचे पाणी पुरविणे, परिसरातील शाळांना शैक्षणिक साहित्य, गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, ग्रामीण विकासांतर्गत प्रकल्प इत्यादी उपक्रमांचा समावेश असल्याचे एस. एम. कुलकर्णी यांनी सांगितले.

## माणगावातील दहिवली गावाच्या रस्त्यावर महाकाय मगरीचा मुक्त संचार

### ग्रामस्थांनी पकडून दिले वन विभागाच्या ताब्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील दहिवली गावाच्या रस्त्यावर गुरुवारी (दि. ४) मध्यरात्रीच्या सुमारास सुमारे १.९० मीटर लांबीची महाकाय मगर मुक्त संचार करताना ग्रामस्थांनी पाहिले. ग्रामस्थांनी या मगरीला पकडून वन विभागाच्या ताब्यात दिले.



गेल्या काही दिवसांपासून माणगावमध्ये मगरींचे वाढते अस्तित्व समोर येत आहे. काळ नदी आणि स्थानिक ओढ्यांमध्ये दिसणाऱ्या मगरी आणि मगरींची पिल्ले आता नागरीवस्ती आणि रस्त्यावर दिसू लागली आहेत. दहिवली गावाच्या रस्त्यावर दिसलेल्या महाकाय मगरीला पकडून त्याबाबतची माहिती ग्रामस्थांनी वन विभागाला दिली. वनक्षेत्रपाल अनिरुद्ध ढगे, वनरक्षक अक्षय मोरे यांनी या मगरीला ताब्यात घेऊन तालुक्यातील गोरेगाव येथे काळ नदीत सोडले.

## माथेरानमध्ये ई-रिक्षेविरोधात अश्वपालांचा मोर्चा

**कर्जत : बातमीदार**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाने माथेरानमध्ये पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरू करावी यासाठी नुकतीच चाचणी घेण्यात आली होती, मात्र आगामी काळात ई-रिक्षा सुरू झाल्यास आपल्या व्यवसायावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे येथील अश्वपालकांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे आणि अधीक्षक कार्यालयात जाऊन ई-रिक्षाच्या विरोधात निवेदन सादर केले.



माथेरानमध्ये मोटरवाहनास प्रतिबंध आहे. ई-रिक्षा सुरू झाल्यास पर्यटनावर अवलंबून असणाऱ्या अश्वपालकांचा व्यवसाय असुरक्षित होणार आहे. तसेच पर्यावरणपूरक असलेली माथेरानची ओळख फुसली जाईल असे अश्वपालकांचे म्हणणे आहे.

आजपर्यंत येथील स्थानिक प्रशासनाने आम्हा अश्वपालकांना विश्वासात घेतले नाही. आम्ही भूमिपुत्र म्हणून गावाच्या विकासासोबत राहिलो आहोत. ई-रिक्षामुळे आमच्या ४६०घोड्यांच्या व्यवसायावर परिणाम होणार आहे. नुकताच झालेल्या ई-रिक्षाच्या चाचणीस आमचा पूर्णपणे विरोध आहे, असे अश्वपालकांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. यावेळी स्थानिक तसेच मूळवासीय अश्वपालक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## रोह्यात स्वातंत्र्याची अमृत महोत्सवी दौड | पोलीस-महसूल अधिकारी, विद्यार्थ्यांसह नागरिक सहभागी

**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रोहा, पाली, नागोठणे व कोलाड पोलीस ठाण्यांच्या संयुक्त विद्यमानाने रोह्यात हर घर तिरंगा व स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी दौड हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.




(छाया : महादेव सरसंबे)

कुंडलिका नदी संवर्धन उद्यान येथून या दौडची सुरुवात झाली. शहरातील नवरत्न हॉटेल, दमखाडी नाका, मेहेंदळे हायस्कूल, राममारुती चौक मार्गे ही दौड पुन्हा कुंडलिका नदी संवर्धन या ठिकाणी आली. तेथे दौडीचा समारोप करण्यात आला. पोलीस दलाचे रोहा उपविभागीय अधिकारी डॉ. किरणकुमार सुर्यवंशी, निरीक्षक प्रमोद बाबर, नागोठणे निरीक्षक विश्वजीत काईगडे, कोलाडचे सहाय्यक निरीक्षक सुभाष जाधव, पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार, रोहा नायब तहसीलदार राजेश थोरे, नगर परिषद मुख्याधिकारी धीरज चव्हाण, डॉ. फरीद चिमावकर आदींसह विविध प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

या दौडीदरम्यान पथनाट्ये, देशभर गीते, सांस्कृतिक कार्यक्रम, समुहनृत्य यासह पोलीस बँड पथकांनी देशभक्तीपर गीते सादर केली. पोलीस दल, महसूल विभाग, नगर परिषद कर्मचारी, विद्यार्थी, सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी, तालुक्यातील पोलीस पाटील आणि नागरिक सहभागी झाले होते.

**PUBLIC NOTICE**

**Gurdwara Sri Guru Singh Sabha (Regd.) Kharghar**
Regd. No. F-4759 (Raigad)
Plot No.8, Sector 22, Kharghar, Navi Mumbai 410 210

**MEMBERSHIP RENEWAL**

This is to inform entire Sangat of Gurdwara Kharghar that Renewal of Annual Membership is being conducted from 6th of August to 20th August 2022, 10:30 am to 1:00 pm. Change of contact details can also be updated during the renewal.

**For Managing Committee**
**Jagir Singh**

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जिल्हा - रायगड, पनवेल-४१०२०६.**

**-: जाहीर सूचना :-**

**विषय :-** सार्वजनिक गणेशोत्सव २०२२ करीता तात्पुरत्या स्वरुपात उभारावयाचे मंडप/स्टेज/कमानी इ.चे परवानगीबाबत.
**संदर्भ :-** जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मे. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उत्सव/सण साजरा करणाऱ्या संस्था/मंडळे/व्यक्ती यांना जाहिर आवाहन करणेत येते की, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, ईद- मोहरम, दही इंडी इत्यादी सार्वजनिक उत्सव तसेच विविध महापुरुषांच्या जयंती/पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजऱ्या केल्या जातात. याकरीता सार्वजनिक ठिकाणी मंडप/स्टेज उभारणी । कमाणी उभारण्यासाठी विविध संस्था/मंडळे महापालिकेकडे अर्ज करीत असतात. सार्वजनिक उत्सव प्रसंगी काही मंडळे वाहतुकीच्या रस्त्यांत मंडपे उभारत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे नागरीकांना तसेच वाहतुकीस अडथळे निर्माण होत असतात.

मा. उच्च न्यायालयात, जनहित याचिका क्र. १७३/२०१० जनहित याचिकेत दिलेल्या निर्देशानुसार मंडप/स्टेज/कमानी उभारणीसाठी परवानगी देण्याबाबत महानगरपालिकेने सविस्तर कार्यपध्दती (S.O.P) तयार केली आहे. या कार्यपध्दतीमध्ये संबंधित मंडळांना परवानगीसाठी http://smartpmc.in/Login या वेबसाईटवर जाऊन खालील कागदपत्र स्कॅन करुन अपलोड करावयाचे आहे. अर्जाचा नमुना, विविध विभागांकडील ना हरकत दाखल्याचा नमुना तसेच परवानगी पत्राचा नमुना निश्चित केला आहे.

या संदर्भात कुठलाही उत्सव सुरु होण्यापुर्वी ३ आठवडे संबंधित व्यक्ती/संस्था यांनी http://smartpmc.in/Login या वेबसाईटवर मंडप परवानगीचा अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल केल्यानंतर पोलीस, वाहतूक, अग्निशमन व बांधकाम या विभागांचे दाखले (N.O.C) प्राप्त झाल्यानंतर अनुज्ञेयता पडताळून पाहिल्यानंतरच परवानगी देण्यात येईल वा नाकारण्यात येईल. महत्वाचे म्हणजे कोणतेही उत्सव सुरु होण्यापुर्वी १० दिवस अगोदर परवानगी घेणे बंधनकारक आहे. मंडळाने, संस्थेने रस्त्यावर खड्डे केल्यास रक्कम रु.९ हजार प्रति चौ.मी. दंड वसूल करण्यात येईल. या सर्व बाबींचा कार्यपध्दतीमध्ये प्रामुख्याने समावेश आहे. अर्जासोबत खालीलनमुद कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

४) धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणी प्रमाणपत्र अपलोड (Scan करुन Upload) करणे. ५) जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र अपलोड (Scan करुन Upload) करणे. ६) स्थळदर्शक नकाशा अपलोड (Scan करुन Upload) करणे.

तसेच पमपा क्षेत्रात येत्या कालावधीत साजरा होणाऱ्या सार्वजनिक उत्सव साजरा करणारे संबंधित मंडळ, संस्था, व्यक्ती, इत्यादी समवेत सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक शाखा, नवी मुंबई, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पनवेल, सर्व शासकिय अधिकारी/सर्व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांची संयुक्त बैठक दि. ०८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवत फडके नाट्यगृह, पनवेल, रायगड या ठिकाणी आयोजित करणेत आलेली आहे. तरी सदर बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे. संबंधित संस्था/मंडळे/व्यक्ती यांना वरिल नियमांची माहिती व्हावी, या दृष्टीकोनातून सदर सदर जाहीर सूचना प्रसिध्द करणेत येत आहे.

जा.क्र.पमपा/परवाना/जा.क्र./८६७/२०२२/मुख्यालय विभाग,
दिनांक :- ०२/०८/२०२२

सही/-
(गणेश देशमुख)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

# शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणार -रणजीत देओल

### परिषदेच्या राज्यस्तरीय शिष्टमंडळाने घेतली भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव रणजीत देओल यांची महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय शिष्टमंडळाने बुधवारी (दि. ३) मंत्रालयात भेट घेऊन शिक्षकांच्या अतिप्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून निवेदन सादर केले.



(छाया : सलीम शेख)

राज्यस्तरीय शिष्टमंडळात राज्य नेते रावसाहेब रोहकले, राज्य कोषाध्यक्ष पुरुषोत्तम काळे, राज्य कार्यकारी अध्यक्ष मधुकर उन्हाळे, राज्य कार्यकारी अध्यक्ष प्रकाश चतरकर, राज्य कार्याध्यक्ष डॉ सतपाल सोवळे, राज्य संपर्कप्रमुख राजेंद्र नांद्रे, राज्य सहकार्यवाह विजय पाटील, राज्य कार्याध्यक्ष भरत मडके, नगर जिल्हा अध्यक्ष प्रवीण ठुबे, गणेश वाघ, संजय कोंडविलकर, उदय गायकवाड, भिकाजी मांढरे, बालाजी गुबनरे आदींचा समावेश होता.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या अतिप्रलंबित खालील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. शालेय पोषण आहाराच्या सन २०१५ते २०२०पर्यंत होणाऱ्या ऑनलाइन लेखापरिक्षणात शिक्षक परिषदेने तीव्र विरोध दर्शवला असून या ऑनलाइन लेखपरिक्षणापूर्वी राज्यातील शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे व त्यातील कागदपत्रांची क्लिष्टता कमी करावी व सदर लेखापरिक्षणास स्थगिती देण्यात यावी, अशा आशयाची मागणी लावून धरण्यात आली.

यावर शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांनी लेखापरीक्षणास स्थगिती देण्याबाबत पत्र निर्गमित करण्यात येईल, असे आश्वासन शिष्टमंडळास दिले व प्रशिक्षणानंतरच याबाबत पुढील कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले.

नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत लागलेल्या व दहा वर्षाच्या आत मयत झालेल्या शिक्षकांना दहा लाख सानुग्रह अनुदानाचे प्रस्ताव जलदगतीने मंजूर करावेत, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, पदोन्नती मुख्याध्यापक, विशेष शिक्षक यांची पदोन्नती दरवर्षी जलद गतीने राबविणे, एमएससीआयटी अहर्ता प्राप्त न केलेल्या शिक्षकांच्या वसुलीस २०डिसेंबर २०१८ च्या परीपत्रकान्वये स्थगिती देण्यात आलेली असून शिक्षकांची वसूल थांबविण्यात यावी व एमएससीआयटीच्या जाचातून शिक्षकांना मुक्त करावे, १०० विद्यार्थ्यांमागे पदोन्नती मुख्याध्यापक देण्यात यावा, जिल्हा परिषद शाळांचे विद्युत देयक भरण्याबाबत अनुदान वितरित करण्यात यावे, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना कॅशलेस विमा मंजूर करणे, आश्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा, आदिवासी नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या शिक्षकांना पूर्वीप्रमाणे एकस्तर वेतनश्रेणी व १५टक्के प्रोत्साहन भत्ता लाभ मंजूर करण्यात यावा, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना सेवानिवृत्तीनंतर रजा रोखीकरण याचा लाभ मंजूर करण्यात यावा, समान काम समान वेतन या निकषानुसार विषय शिक्षकांच्या १००टक्के पदांना वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करावा, अप्रशिक्षित वस्तीशाळा शिक्षकांचा सेवाकाल वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राह्य धरावा, वस्तीशाळा शिक्षकांची मुळ नियुक्ती दिनांक वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी आदी प्रलंबित मागण्यांबाबत या वेळी सविस्तर चर्चा झाली.

या बाबत जिल्हा परिषदांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. धोरणात्मकबाबी तपासून शिक्षकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून निर्णय घेतला जाईल. असे सकारात्मक आश्वासन शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांनी या वेळी शिक्षक परिषदेच्या राज्यस्तरीय शिष्टमंडळास दिले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

# रोह्यात आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊचे वाटप


(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी येथील पहिली ते दहावीपर्यंतच्या आदिवासी विद्यार्थ्यांना युवामोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अमित यांच्या माध्यमातून शुक्रवारी (दि. ५) शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग, रोहा तालुका सरचिटणीस अविनाश कान्हेकर, महिला मोर्चाच्या सरचिटणीस श्रद्धा घाग, कामगार सेलचे अध्यक्ष विलास डाके, सरपंच रघुनाथ कोस्तेकर, सामाजिक कार्यकर्त्या गुलाबताई वाघमारे, सुप्रिया तुपकर, सुरेश वाघमारे, हरिश्चंद्र पवार, वसंत पवार, संतोष पवार, अक्षय वाघमारे, योगेश वाघमारे, निलेश वाघमारे, महेश वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# मतदार ओळखपत्राशी आधार क्रमांक संलग्न करणे गरजेचे -तहसीलदार रोहन शिंदे

**मुरुड : प्रतिनिधी**

बोगस मतदार नोंदणीला आळा घालण्यासाठी आधार क्रमांक मतदान ओळखपत्राशी संलग्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ५) येथे केले.

निवडणूक आयोगच्या आदेशानुसार १ ऑगस्टपासून मतदार यादीतील नोंदणीकृत मतदारांच्या मतदार ओळखपत्राशी आधारकार्ड संलग्न करण्याचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची ओळख व प्रसार करणेसाठी शुक्रवारी सकाळी वसंतराव नाईक महाविद्यालय व अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज ऑफ सायन्स येथे जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. त्यात तहसीलदार रोहन शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. आधार कार्ड मतदार ओळखपत्राशी संलग्न करण्यासाठी आम्ही बीएलओच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे शिंदे यांनी या वेळी सांगितले.


(छाया : संजय करडे)

प्राचार्य डॉ. मेहबूब नगरबावडी व प्राचार्य डॉ.साजिद शेख यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी यांनी मतदार ओळखपत्राशी आधारक्रमांक संलग्न करण्यासाठी असलेल्या फॉर्म नं.६ ब विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच एनव्हीएसपी या संकेतस्थळावर तसेच वोटर हेल्पलाईन या शासकीय अ‍ॅपवर ऑनलाइन स्वरूपात फॉर्म ६ब भरण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. मधुकर वेदपाठक यांचेही या वेळी भाषण झाले. विद्यार्थी आणि प्राध्यापक या वेळी उपस्थित होते.

# मुरूडमध्ये स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहीम

## नागरिकांचा सहभाग; एक टन कचरा जमा

**मुरूड : प्रतिनिधी**

स्वच्छ सागर, सुरक्षित सागर, स्वच्छ किनारा सुरक्षित समुद्र या मोहिमेतंर्गत गुरूवार (दि. ४) सकाळी मुरूड समुद्र किनारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगर परिषद, तहसीलदार कार्यालय, शहरातील बँका, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सहाय्याने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत मुरूड समुद्र किनाऱ्यावरील सुमारे एक टन कचरा गोळा करण्यात आला.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना सागरी आरोग्य सुधारण्यासाठी देशातील ७५समुद्र किनाऱ्यांवर स्वच्छ सागर, सुरक्षित सागर, स्वच्छ किनारा सुरक्षित समुद्र ही मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम ७५दिवसांची असून, ती ५जुलैपासून सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील सहा सागरी किनाऱ्यांवर ही मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यापैकी मुरूड समुद्र किनाऱ्यावर गुरूवारी सकाळी उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्वच्छता मोहिमेला सुरूवात करण्यात आली. माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, तहसीलदार रोहन शिंदे, नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे, प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, नायब तहसीलदार रवींद्र सानप, गोविंद कोटंबे, माजी नगरसेवक पाडुरंग आरेकर, अविनाश दांडेकर, प्रमोद भायदे, दीपाली दिवेकर, अनुजा दांडेकर, नरेंद्र नांदगावकर, मनोज पुलेकर, संजय वेटकोळी, आरोग्य विभागाचे अधिकारी राकेश पाटील, महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक दिपेश लोखंडे यांच्यासह तहसील व नगर परिषदेचे सर्व कर्मचारी या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

**स्वच्छ सागर, सुरक्षित सागर मोहिमेला नागरिकांनी सहकार्य करावे. प्लास्टिकमुळे समुद्र व समुद्री जिवांवर विपरीत परिणाम होतो. अस्वच्छता पसरली जाते. त्यामुळे नागरिकांनी प्लास्टिकच्या पिशव्या वापरु नयेत.**
**–पंकज भुसे, प्रशासक, मुरूड नगर परिषद**



# कै. राजेय भोसले स्मृतीदिनी महाडमध्ये शालेय साहित्याचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

कै. राजेय भोसले यांच्या व्दितीय स्मृतीदिनी मंगवारी (दि. २) प्रतिष्ठानच्या वतीने कोंझर येथील विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

महाडमधील समाजसेवक राजेय भोसले यांच्या व्दितीय स्मृतीदिनी मंगळवारी कोंझर येथील राजमाता जिजाऊ विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या आणि खाऊचे वाटप करण्यात आले. कै. राजेय भोसले प्रतिष्ठानचे महेश शिंदे, तसेच बिपीन महामुणकर, जयवंत दळवी यांची समयोचीत भाषणे झाली. संदिप ठोंबरे, निलेश तळवटकर, चंद्रजित पालांडे, तुषार महाजन तसेच कै. राजेय भोसले यांची कन्या वैष्णवी भोसले, चिरंजीव विश्वतेज भोसले, सुमेध भोसले, भूषण भोसले, शशिकांत मोरे, शांताराम अंबिके, सई शिंदे, मुख्याध्यापक कुलकर्णी आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते. पोलीस पाटील योगेश देवघीरकर यांनी आभार मानले.

# महाडमध्ये वैश्यवाणी समाजाचा मेळावा उत्साहात

**महाड : प्रतिनिधी**

वैश्यवाणी समाज सेवाभावी संघटनेचा वार्षिक मेळावा महाडमधील विरेश्वर मंदिर सभागृहात संपन्न झाला. कै. आबासाहेब वारंगे, वामनाश्रम स्वामी यांच्या प्रतिमा पूजनाने मेळाव्याला सुरूवात झाली.

चिपळूणमधील उद्योजक सतीश खेडेकर हे या मेळाव्याला उपस्थित होते. त्यांचे स्वागत सुधीर मांडवकर यांनी केले. या वेळी समाजातील उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. दहावी, बारावी आणि महाविद्यालयीन, उच्चशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कै. आबासाहेब वारंगे यांच्या स्मरणार्थ विनिता वारंगे आणि कै. रामचंद्र गणपतशेठ वारंगे यांच्या स्मरणार्थ शिरीषभाई वारंगे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतदेखील वाटप केली. सुधाकर गांगण यांनी मयुरेश महाकाळ यास दत्तक घेतले. महाडच्या माजी नगराध्यक्षा उषाताई कुडाळकर, संगिता थरवळ, शिरीषभाई वारंगे, संघटनेचे माजी अध्यक्ष दादा महाकाळ, सुवर्णा थरवळ आदींनी मनोगत व्यक्त केले.

या मेळाव्याचे सूत्रसंचालन संपदा खातू, संदीप खातू, प्रिया थरवळ यांनी केले. संघटनेचे शहर अध्यक्ष अशोक वारंगे, उपाध्यक्ष अनिल ताठर, अप्पा थरवळ, महिला मंडळ अध्यक्ष दीप्ती गुडेकर यांच्यासह समाज बांधव या मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. राजेंद्र जैतपाल यांनी सर्वांचे आभार मानले.


(छाया : महेश शिंदे)

# पेणमध्ये पत्रकारांसह कुटुंबीयांची आरोग्य तपासणी


(छाया : अनिस मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

गॅलेक्सी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल-पेण, पत्रकार उत्कर्ष समिती आणि श्री समर्थ क्लीनिकल लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने पेण येथे नुकतीच पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ. रत्नदीप गवळी यांच्या पुढाकाराने पेणमधील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये पत्रकाराचे व त्यांच्या कुटूंबियांसाठी जनरल हेल्थ चेकअप तसेच नेत्ररोग व स्त्री रोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन हॉस्पिटलचे व्यवस्थापक राजेश टेलर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. रोहित खापरे, डॉ. नयना जवाहर मुलानी, डॉ. रत्नदीप गवळी यांच्यासह सचिन पाटील यांनी या वेळी पेण, खालापूर, पनवेल, अलिबाग तालुक्यातील पत्रकारांची व त्यांच्या कुटुंबियांची आरोग्याची तपासणी करण्यासाठी योगदान दिले. तसेच श्रेयस ऑप्टिक्स व श्री स्वामी समर्थ लॅब यांच्यावतीने या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, सीबीसी, लघवी आदी तपासण्या करून त्यांचे निदान करण्यात आले.

# जामरुंग शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील जामरुंग येथील प्रभाकर पाटील माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मुंबई गोरेगाव येथील माहेश्वरी प्रगती मंडळातर्फे बुधवारी (दि. ३)शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी खांदन, सराईवाडी आणि हिरेवाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनाही मंडळातर्फे शैक्षणिक साहित्यांची मदत करण्यात आली.


(छाया : संतोष पेरणे)

माहेश्वरी प्रगती मंडळ गोरेगाव क्षेत्रीय समिती मुंबई यांच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून जामरुंग विद्यालय तसेच खांदन, सराईवाडी आणि हिरेवाडी येथील शाळांना शैक्षणिक तसेच क्रीडा साहित्याचे वाटप केले जात आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांना बुधवारी रजिस्टर, वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, कंपास बॉक्स इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांसह ग्रामपंचायत सदस्या वनिता सावंत, ग्रामस्थ मंगेश सावंत, संतोष पिंपरकर, शाळेचे मुख्याध्यापक पिंगळे उपस्थित होते.

# कृषी क्षेत्रात दर्जात्मक संशोधनाला प्राधान्य देणार –डॉ. संजय भावे

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

देशांतर्गत तांत्रिक ज्ञान सुधारण्यासह कृषी क्षेत्रातील दर्जात्मक संशोधनाला प्राधान्य देणार, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे नवनियुक्त संशोधन संचालक डॉ. संजय भावे यांनी बुधवारी (दि. ३) कर्जत येथे केले.

कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत डॉ. संजय भावे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. अमेरिका, इस्त्राएलमध्ये शेती कशी होते यापेक्षा परंपरागत शेती उत्कृष्टरीत्या कशी होईल, याकडे जादा लक्ष द्या, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

डॉ. भावे पुढे म्हणाले की, वैशिष्ट्यपूर्ण भात जातींसह आरोग्यवर्धक तसेच उद्योगासाठी लागणाऱ्या तांदुळावर संशोधन होण्याची गरज आहे.

डॉ. एस. बी. गंगावणे, डॉ. बी. डी. वाघमोडे, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. व्ही. एन. जालगावकर, डॉ. देवमोरे, डॉ. टी. जे. बेडसे, डॉ. व्ही. पी. सावंत, डॉ. पी. बी. वणवे, डॉ. एन. व्ही. म्हसकर, डॉ. डी. जी. जोंधळे यांनी चर्चेत सहभाग नोंदविला. या वेळी संशोधन केंद्राच्या वतीने सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत यांनी डॉ. संजय भावे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तत्पूर्वी डॉ. भावे यांनी प्रक्षेत्रावरील विविध प्रयोगांची पाहणी केली. विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी आभार मानले.

# जिल्ह्यात हर घर जल उत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त रायगड जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. घरोघरी तिरंगा अभियान यशस्वी करण्याचे नियोजन करण्यासोबत रायगड जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात २५जुलैपासून हर घर जल उत्सव ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत १२ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील गटविकास अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, ग्रामसेवक यांच्यासोबत ऑनलाइन बैठकीच्या माध्यमातून बुधवारी (दि. ३) संवाद साधला.



हर घर जल उत्सव अंतर्गत १००टक्के वैयक्तिक व संस्थात्मक नळ जोडणी पूर्ण करणाऱ्या गावांसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करणे, ग्रामसभांमध्ये हर घर जल गाव घोषित करणे, प्रत्येक नागरिकाला ५५लिटर प्रतिदिन पाणीपुरवठा करणे यासह इतर बाबींचा समावेश आहे. विविध उपक्रम राबवून हर घर जल उत्सव ही विशेष मोहीम यशस्वी करण्याबाबत बैठकीत सूचना देण्यात आल्या.

या ऑनलाइन बैठकीत घरोघरी तिरंगा अभियान यशस्वी करण्यासाठी तालुका स्तरावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना, अमृत सरोवर योजनेअंतर्गत सुरू असलेली कामे यांचा आढावा घेण्यात आला.

या ऑनलाइन बैठकीला सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षातील सल्लागार उपस्थित होते.

## जि. प. ची विशेष मोहीम

### असा साजरा करा उत्सव

- गाव 'हर घर जल' घोषित करण्यासाठी विशेष ग्रामसभांचे आयोजन करावे.
- १०० टक्के कुटुंबांना नळ जोडणी, ५५ लिटर प्रती दिन शुद्धपाणी मिळत असलेबाबत ग्रामसभेत नागरिकांच्या अभिप्रायांचे व्हिडिओ ग्रामसभेत घेण्यात यावेत.
- प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा होत आहे, अशी गावे हर घर जल म्हणून घोषित करावीत.
- वैयक्तिक व संस्थात्मक स्तरावर शंभर टक्के नळ जोडणी झालेल्या ग्रामपंचायतींनी आपली ग्रामपंचायत 'हर घर जल' घोषित करावी.
- ग्रामपंचायतीमध्ये एफटीके किटद्वारे पाणी नमुने तपासण्याची मोहीम राबवावी.
- 'हर घर जल' घोषित ग्रामपंचायतींनी रांगोळी, गाव फेरी, पथनाट्य आदीद्वारे उत्सव, समारंभ साजरा करावा.
- 'हर घर जल' उत्सवात ग्रामपंचायत आरोग्य केंद्र, उपकेंद्र, शाळा, अंगणवाडी, आश्रमशाळा आदींमधील सर्व लाभधारकांनी सहभागी व्हावे.
- शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीचे आयोजन करून जल प्रतिज्ञा घेण्यात यावी.
- हर घर जल उत्सवामध्ये गावातील पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ तसेच शाळा, अंगणवाडी इत्यादी सर्व घटकांना सहभागी करुन घ्यावे.

# मुंबई विद्यापीठ रायगड विभाग सांस्कृतिक युवा महोत्सवाचा कर्जतमध्ये शुभारंभ

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या उत्तर रायगड विभागाच्या ५५व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाचा शुभारंभ गुरुवारी (दि. ४) कर्जतच्या कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात करण्यात आला. या महोत्सवात कर्जत, पनवेल, खालापूर, उरण तालुक्यातील २९महाविद्यालयातील पंधराशे विद्यार्थ्यांनी भाग घेतला असून मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात युवा महोत्सवाचे आयोजन करणारे कोकण ज्ञानपीठ फार्मसी महाविद्यालय हे पहिले महाविद्यालय ठरले.

राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या परिसंवाद सभागृहात माजी कुलसचिव उरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. विविध स्पर्धांमधील सहभागामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गायकवाड यांनी या वेळी केले.



प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी महाविद्यालयाचा चढता आलेख सांगितला. विद्यापीठ समन्वयक डॉ. निलेश सावे, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा. मनीषा चौधरी यांनी केले. जिल्हा समन्वयक डॉ. पराग करूळकर, डॉ. दीपक गायकवाड, शिवराम पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थ या वेळी उपस्थित होते.

या महोत्सवात शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन, शास्त्रीय नृत्य, लोक नृत्य, एकांकिका मराठी व हिंदी, वाजतृत्व, मिमिक्री, रांगोळी, पेंटिंग, मेहेंदी, शिल्पकला, पाश्चिमात्य गायन व वादन आदी ३२स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध कलाकार राहुल वैद्य, संजय निखिते, दिलीप गडकरी, संजय वझरेकर, प्रदीप गोगटे, मकरंद पाध्ये, कौस्तुभ आपटे, वृषाली वैद्य, केशर चोपडेकर, नृत्य दिग्दर्शक देवेंद्र शेलार आदी ६० परीक्षक या स्पर्धांचे परिक्षण करणार आहेत.


(सर्व छाया : लक्ष्मण ठाकूर)



























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com